स्था १९८६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. २२५

नोंद क्र.
३२५

REFBK 0000325
REFBK-0000325

२|०|१९०६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. २२५

नोंद क्र. ३२५

REFBK-0000325

सा।१ ९८०६

३२२५

२२५

मं. ३२१ — ३.८६

श्री

# मराठ्यांच्या इतिहासाचीं

# नवीन साधनें.

प्रो. महादेव गणेश डोंगरे बी. एस्‌सी., एल्. सी. ई.

राजाराम कॉलेज कोल्हापूर,

यांनीं

कोल्हापूर "मिशन छापखान्यांत" छापून प्रसिद्ध केलीं.

सन १९०६ इ०.

श्री

श्रीमन्महाराज श्रीशाहू छत्रपती सरकार करवीर

जी. सी. एस्. आय्, जी. सी. व्ही. ओ.,

एम. आर. ए. एस्, एल्एल्. डी.

स्वामीस

स्वामिभक्तिपूर्वक परमादरानें अर्पण केलेले

REFBK-0000325

प्रो. महादेव गणेश डोंगरे, बी. एस्सी., एल्. सी. ई.

राजाराम कॉलेज कोल्हापूर,

यांनीं छापून प्रसिद्ध केलेले

# ऐतिहासिक ग्रंथ.

(१) भोंसले-कुलाचा वंशवृक्ष व (२) श्रीसिद्धांतविजयग्रंथ

# प्रकाशकाची विज्ञप्ति.

आह्मी (१) **भोंसले—कुलाचा वंशवृक्ष,** व (२) **श्रीसिद्धांत-विजय** असे दोन ग्रंथ प्रसिद्ध करून, दक्षिणेंतील क्षत्रियमराठ्यांस वैदिक-कर्मसंबंधी आपले धार्मिक हक्क पुनरपि मिळविण्यास जे महत्प्रयास पडले त्याबद्दलचा आजतागायत अज्ञातवासांत असलेला महाराष्ट्राच्या इतिहासाचा भाग जगापुढें आणिला आहे. साताऱ्यास कै० प्रतापसिंहमहाराजाच्या कारकिर्दीत ब्राह्मण व क्षत्रिय—मराठे ह्या दोन जातींमध्यें वेदोक्ताच्या हक्का-संबंधानें जो मोठा वाद झाला त्याची सर्व हकीकत श्रीसिद्धांतविजयांत असून, अलीकडील कोल्हापूर येथील वेदोक्तसंबंधी तंट्याचाही इतिहास परिशिष्टरूपानें दिलेला आहे. स्वधर्माभिमान व जात्याभिमान असणाऱ्या प्रत्येक क्षत्रिय—मराठ्यानेंच नाहीं, तर खरा इतिहास जाणण्याची इच्छा करणाऱ्या प्रत्येक सुशिक्षित क्षत्रियेतर गृहस्थानेंही सदरहु ग्रंथ अवश्य संग्रह करण्यालायक आहेत. लोकाश्रय मिळून पहिली आवृत्ति लवकरच खलास झाल्यास, ह्याच ग्रंथांची दुसरी आवृत्ति काढण्यास व असेच आणखी ऐतिहासिक ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यास आह्मास उत्तेजन येईल. करितां ज्या कोणा सद्गृहस्थास सदरहु ग्रंथांच्या प्रती विकत घेऊन ह्या देशकार्यास स्वशक्त्यनुसार हातभार लावण्याची इच्छा असेल, त्यांनीं त्याप्रमाणें पुस्तकांची मागणी पुढें दिलेल्या पत्त्यावर करण्याची कृपा करावी. आमच्या ग्रंथांतील विषयाच्या महत्वाची कल्पना लोकांस बरोबर यावी ह्मणून त्यांच्या प्रस्तावना पुढें दिल्या आहेत त्या अवश्य वाचून पाहाव्यात, अशी विनंती आहे.

म. ग. डोंगरे

३
७०५

# भोंसले–कुलाचा वंशवृक्ष.

## प्रस्तावना.

सुमारें तीन वर्षांपूर्वी कोल्हापुरास कांहीं ब्राह्मण व क्षत्रिय मराठे मंडळीमध्यें वेदोक्त कर्माधिकाराविषयीं तंटा उपस्थित झाला. मराठी राज्याचे संस्थापक–श्रीशिवाजी महाराज यांच्या वंशजांस सुद्धां वेदोक्त कर्माचा अधिकार नाहीं, मग इतर मराठ्यांची काय कथा, असें ब्राह्मण–पक्षाचें ह्मणणें असून उलटपक्षीं आह्मी क्षत्रिय असल्यानें आम्हांस वेदोक्त कर्माचा पूर्ण अधिकार आहे, असें प्रतिपादण्यांत आलें होतें. वास्तविक पहातां ह्या प्रश्नाचा पूर्वी एकदां योग्य रीतीनें निकाल लागून त्याप्रमाणें अम्मलबजावणीही झाली असल्यामुळें, पुनरपि तेंच भांडण उपस्थित व्हावें, ही बेकायदेशीर गोष्ट आहे. मराठी राज्याच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, शिवाजी महाराजांनीं इ. स. १६७४ सालीं आपणास जो राज्याभिषेक करून घेतला तो शुद्ध क्षत्रियाच्या धार्मिक हक्काप्रमाणें वेदोक्त पद्धतीनें झालेला होता. प्रथमतः अज्ञानामुळें ह्या राज्याभिषेकास कित्येक दाक्षिणात्य पंडितांनीं हरकत घेतली होती हें खरें; परंतु भोंसले कुलाच्या क्षत्रियत्वाविषयीं पूर्ण अभिमान असणाऱ्या साह्यकारी मंडळीनें अश्रांत श्रम करून उदेपुराहून माहिती आणून श्रीकाशीक्षेत्रस्थ गागाभटादि पंडितांची खात्री करून दिली कीं, शिवाजीमहाराज हे उदेपूर–कुलोत्पन्न खरे क्षत्रिय असल्यामुळें त्यांस राज्याभिषेक वेदोक्त पद्धतीनेंच झाला पाहिजे. त्यानंतर गागापंडित खुद्द काशीहून दाक्षिणेंत रायगडीं आले, व त्यांनीं शिवछत्रपतीस यथासांग राज्याभिषेक केला. (सर देसाईकृत ‘ मराठी रियासत ’ पूर्वार्ध ; पानें २४८-२५७ पहा.)

श्री शिवाजीमहाराजांचे राज्याभिषेकामुळें भोंसले कुलाच्या धार्मिक हक्कांचें पुनरुज्जीवन झालें, त्यास पहिल्या शाहूमहाराजांच्या कारकिर्दी–अखेरपर्यंत कांहीं अडथळा आला असेल असें मानण्यास मुळींच आधार दिसत नाहीं. इ. स. १७४९ सालीं शाहूमहाराजांनीं आपल्या निधन–समयीं सनद करून मराठी राज्य पेशव्यांचे स्वाधीन केलें तेव्हांपासून, पेशवाई बुडून इंग्रज सरकारचें कृपेनें सातारचें राज्य शिवछत्रपतीच्या वंशजांस इ. स. १८१९ सालीं परत मिळेपर्यंत जो काल गेला त्यांत सातारचे राजे जरी पारतंत्र्यांत होते तरी आपले धार्मिक हक्क जाणून बुजून घालविण्याइतके सातारचे राजे कधींच दुर्बल नव्हते. परंतु शिवछत्रपतीच्या वंशजांस पुनः राजसत्ता प्राप्त होतांच त्यांस आपल्या धार्मिक हक्कांचें पुनरुज्जीवन करावें लागलें, ह्यावरून कदाचित् दुसरे बाजीरावाचे धामधूमीच्या कारकिर्दींत सातारचे राजघराण्याचें वेदोक्त कर्म कोणी लुच्चेगिरीनें बंद पाडिलें असेल असा संशय येतो (बिजेकृत 'क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व,' पानें १८५–१८७). जेव्हां करवीरास राज-घराण्यांत सुद्धां वेदोक्त कर्म होण्यास हरकत आली तेव्हां ह्या अगदीं अलीकडच्या ग्रामण्यासंबंधानें कांहीं कागद सांपडतात कीं काय, हें पाहण्याच्या उद्देशानें सातारचे कै० श्री० आबासाहेब महाराज यांजपाशीं तेथील खासगी दप्तर चाळण्याची आह्मीं परवानगी मागितली, ती त्यांनीं कृपाळु होऊन दिली ह्याबद्दल आह्मांवर कैलासवासी महाराजांचे अत्यंत उपकार आहेत. तसेंच महाराजांचे माजी कारभारी रा. रा. दत्तात्रय गोविंद कारखानिस, व सातारचे प्रसिद्ध वकील व आमचे मित्र रा. रा. शंकर आप्पाजी गुप्ते एल एल. बी. ह्या उभयतांनीं आह्मास वेळोवेळीं अंतःकरणपूर्वक मदत केली ह्याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहों.

सातारच्या दप्तरांत जे कागदपत्र आमच्या पाहण्यांत आले त्यावरून असें दिसतें कीं, शिवछत्रपतीच्या वंशजांस वडिलोपार्जित राज्य इ. स. १८१९ सालीं मिळालें खरें; परंतु महाराज अज्ञान दशेंत असल्यामुळें इ. स. १८३० सालापर्यंत मे० पोलिटिकल एजंट साहेब बहादूर सातारा यांच्या अध्यक्षतेखालीं राजमंडळामार्फत संस्थानचा कारभार चालला

होता. ह्याच सुमारास ब्राह्मण व इतर जातींमध्यें वेदोक्त कर्माधिकारासंबंधानें तंटा लागलेला होता. पेशवाई बुडाल्यानंतर सुद्धां श्री० कै० चिंतामण पांडुरंग पटवर्धन सांगलीकर, निळकंठ शास्त्री थत्ते व बाळाजीपंत नातू पुणेंकर या त्रिवर्गांनीं पुढाकार घेऊन, सांगलीस नवीन ग्रंथ तयार करून इ. स. १८२० ते १८२८ ह्या मुद्दतींत एक ग्रामण्य माजविलें होतें. ह्या खटपटी मंडळीनें करवीरकर श्रीशंकराचार्यास पुण्यास नेऊन, त्यांस एकच बाजू दाखवून कलींत क्षत्रिय मुळींच नसल्यानें ब्राह्मणेतरांस वेदोक्त कर्माचा अधिकार नाहीं, वगैरे मतलबाची यादी श्रीच्या सही शिक्यानिशीं मिळवून तिच्या नकला ह्या वरील पुढाऱ्यांच्या पत्रांसोबत हिंदुस्थानांत एकंदर ७९ टिकाणीं पाठविण्यांत आल्या होत्या. ह्या यादींत ' शिवाजी, संभाजी, शाहू महाराजांनीं पृथ्वींत क्षत्रिय मुळींच नाहींत, असें ठरविल्याचे दाखले महाराजांचे दप्तरांत बार झालेले आहेत, असा खोटा मजकूर घातला असल्यामुळें आपल्या धार्मिक हक्कांस ह्या यादीनें बाध येत आहे हें पाहून मराठे क्षत्रिय मंडळीनें जमा होऊन ता० २७ जुलई सन १८२८ रोजीं राजमंडळास अर्ज केला कीं, ब्राह्मणांनीं खोटीं विधानें करून जागजागीं याद्या पाठवून लोकांचा गैर समज मुद्दाम केला आहे तो पाठविलेल्या याद्या परत आणवून किंवा दुसरे रीतीनें नाहींसा करावा; नाहींतर आह्मी आपला विचार करूं.

आमच्या पाहण्यांत आलेल्या कागदपत्रांवरून राजमंडळानें सदरहू अर्जाचा कांहीं विचार केलेला दिसत नाहीं. पण पुढें सन १८३० सालीं महाराजांस मुखत्यारी मिळाल्यावर त्यांनीं ह्या वेदोक्त प्रश्नाचा पुन्हां निकाल लावण्याचा निश्चय केला; व सारखे ८।९ वर्षे अव्याहत श्रम करून हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या पंडितांकडून आपलें व आपल्या आप्त स्वकीयांचें क्षत्रियत्व कबूल करून घेतलें. ह्या ग्रामण्यासंबंधाच्या कागदपत्रांपैकीं जे साताऱ्च्या खाजगी दप्तरांत आमच्या पाहण्यांत आले त्यांपैकीं खालीं दिलेले फार महत्त्वाचे आहेत :—

( १ ) सिद्धांतविजय संस्कृत हस्तलिखित पोथी; अध्याय दहा. पैकीं पहिले पांच छापून प्रसिद्ध झाले आहेत.

(२) शिवानंदाची हिंदी वंशावळ.

(३) उदेपुरच्या राणाजीची २१० पुरुषांची वंशावळ; ह्या कागदावर कंपनी सरकारचा शिक्का असून ती श्रीनारायणापासून सातारच्या श्रीप्रतापसिंहमहाराजापर्यंत आणलेली आहे.

(४) सुर्यवंशाची १६१ पुरुषांची वंशावळ यादी.

(५) श्रीप्रतापसिंहमहाराजांनीं आपणास वेदोक्त राज्याभिषेक ज्या पोथीवरून करून घेतला ती हस्तलिखित संस्कृत पोथी.

(६) सदरहू राज्याभिषेकासंबंधानें पंडितांचीं आलेलीं पत्रें.

(७) सदरहू ग्रामण्याचे वेळीं वाद होऊन जे शास्त्रग्रंथ तयार झाले ते हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या पंडितांस पसंत ठरून सातारच्या राज–घराण्यास व त्यांच्या नातेवाइकांस वेदकर्माचा पूर्ण अधिकार असल्याबद्दलची ठिकठिकाणांहून आलेलीं पत्रें, याद्या व रिवाजपत्र्या.

(८) उदेपुरास रघुनाथसिंग ह्याले ह्या बरोबर पाठविलेलें पत्र.

(९) साताऱ्याहून उदेपुरास बापू कान्होबा यांस पाठविलें होतें, त्यांचें तिकडून आलेलें पत्र.

(१०) सातारच्या महाराजांनीं ग्रामण्याचा निकाल झाल्यावर समस्त क्षत्रिय मराठ्यांस पाठविलेली यादी.

(११) मराठे मंडळीच्या सभांची हकीकत.

(१२) शिवानंदाबरोबर उदेपुरास पाठविण्याचीं पत्रें; व बरोबर जाणाऱ्या मंडळीचीं नांवें.

(१३) शिवानंदानें दक्षिणेंतून उदेपुरच्या राजपुरोहितास पाठविलेलें पत्र.

(१४) मराठे मंडळीपासून घेतलेली कबुलायत.

वरील प्रकारचे कागद शोधून काढण्याचे उद्योगांत असतांना आह्मांस असें समजलें कीं, सुर्यवंशाची १६१ पुरुषांची वंशावळीची जी यादी आमच्या पाहण्यांत आली, ती वंशावळ मुख्य धरून सोमसूर्य दोन्ही वंशांचा मोठा वृक्ष पाण्यांतील रंगांत वरील ग्रामण्याचे वेळींच साताऱ्यास तयार झाला होता. परंतु सातारच्या दप्तरांत हा वंशवृक्ष किंवा त्याची अस्सल बरहुकूम नक्कल आह्मांस सांपडली नाहीं.

इतक्यांत अशी माहिती मिळाली कीं, साताऱ्चे दप्तराचा कांहीं भाग पुण्यास श्रीजंगली महाराजांचे वाडयांत आहे. तेथें कदाचित् वरील वंशवृक्षाचा नकाशा सांपडण्याचा संभव आहे.

श्रीशहाजी उर्फ जंगली महाराज कैलासवासी होऊन बरींच वर्षें झालीं. सांप्रत पुण्यास त्यांचा खासगी वाडा असून तेथें कैलासवासी महाराजांच्या पत्नी श्री. मातोश्री माईसाहेब महाराज राहत असतात. त्यांजकडे आम्ही आमचे मित्र श्री. रा. रा. रघुनाथ बाजीराव ऊर्फ दादासाहेब पोतनीस उरोडेकर यांचे मार्फत गेलों असतां, श्री. मा. माईसाहेबांनीं मोठ्या संतोषानें आह्मांस तेथील दप्तर चाळण्याचीच नाहीं, तर जे कागद आमच्या उपयोगाचे असतील ते घेऊन जाण्याची देखील परवानगी दिली, ह्या कृपेबद्दल श्री० राणीसाहेबांचे आह्मी निरंतर कृतज्ञ आहों. परमेश्वरकृपेनें आमच्या व श्री. दादासाहेब पोतनिसांच्या प्रयत्नांस यश येऊन, ज्या वंशवृक्षाच्या शोधांत होतों त्याची अस्सल बरहुकूम नक्कल आह्मांस मिळाली. सदरहू वंशवृक्ष ७९ वर्षांपूर्वी तयार झाला असल्यामुळें तो बऱ्याच जीर्णावस्थेंत आहे. सबब आमचे मित्र रा. रा. बाळकृष्ण रामचंद्र कारखानिस ड्रॉइंग मास्तर कोल्हापूर यांजकडून सदरहू नकाशाची नक्कल--मुळच रंग व रचना यांत बिलकुल फरक न करितां--करून घेतली. मूळ वंशवृक्ष २३ फूट लांब व ३ फूट रूंद असल्यामुळें तो जशाचा तसा न छापतां त्याचा ⅓ आकार करून आज छापून प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला ह्याबद्दल संतोष वाटतो.

सूर्यवंशाचा मुख्य वेल ज्या सुवर्णकलशांतून निघालेला आहे त्यावर दोन लेख असून, कलशा-खालच्या संगमरवरी चबुतऱ्यावर दोन लहान, व चबुतऱ्याच्या बाजूला दोन मोठीं, अशीं चार चक्रें लेखपूर्ण आहेत. तशींच शेंड्याकडेही दोन चक्रें आहेत. शिवाय वेलाच्या विस्तारामध्यें ठिकठिकाणीं ऐतिहासिक व पौराणिक माहिती घातली आहे. नकाशांतील लेखवरूनच असें दिसतें कीं, मूळ वंशवृक्ष कै० श्री० प्रतापसिंह महाराजांचें आज्ञेवरून अनेक सस्कृत, प्राकृत, पारशी व हिंदुस्थानी ग्रंथांचे आधारा-

वरून माधवराव मुनशी यानें केला. त्याची नक्कल बळवंतराव राजे भोंसले सेनापति यांचे आज्ञेवरून गणपतराव मुनशी यानें शके १७५९ (इ० स० १८३८।३९सांत) सातान्यास केली.

मूळ वंशवृक्षकारानें खालीं दिलेल्या ग्रंथांच्या आधारानें सहरहु नकाशा तयार केला:—

पारशी ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १ लब्बुतवारिख, | २ फिरस्ता, | ३ जामेजाहनुमा, |
| ४ अरायषमहफिल, | ५ कवाइफ हिंदुस्थानी, | ६ अकबरनामा, |
| ७ तवारिखे बहामनी. | | |

हिंदी ग्रंथ.

| | | |
|---|---|---|
| १ महाराजांची बखर, | २ वैराट चरित्र, | ३ उदेपुरची बखर, |
| ४ विजयस्तंभावरील लेख, | ५ ............ | ६ ....छानी चरित्र, |
| ७ किरकोळ. | | |

संस्कृत ग्रंथ.

| | | |
|---|---|---|
| १ भागवत, | २ विष्णुपुराण, | ३ मनुस्मृति, |
| ३ कात्यायनस्मृति, | ४ रामायण, | ६ राजावली, |
| ७ राजमयूख, | ८ जोतिष, | ९ सौरपुराण. |

मूळ वंशवृक्षकार ह्मणतात कीं, "वरील ग्रंथांत जितका वंशविस्तार आहे तितका ह्या नकाशांत दिलेला नाहीं. मुख्य श्रीमन्महाराज छत्रपति यांचा वंशवृक्ष लिहावयाचा, परंतु शक संवत्सरासुद्धां प्रमाण दिसलें पाहिजे ह्मणून दिल्लीचे राज्यावर कोण कोण जाहले, व जरासंधाचे राज्यावर कोण कोण आले, ते पुरुष लिहिले आहेत." चबुतऱ्याजवळील डावे मोठे चक्रांत कोणत्या वशास कोणता रंग योजिला आहे ह्याची समजूत देऊन उजवेकडील मोठे चक्रांत वे० शा० भालचंद्रशास्त्री खांडे-

कर यांनीं क्षत्रियांचे अस्तित्वाबद्दल मूळ वंशवृक्षकारास जीं प्रमाणें दिलीं होतीं तीं घातलीं आहेत. शेंड्याकडील उजवे चक्रांत 'संशयनिवारण,' व डावेकडील चक्रांत 'शकगणती' आहे.

सदरहु नकाशांत मुख्य वेलानें सूर्यवंश दाखविला आहे, त्याचे दोन भाग पडतात: पहिला श्रीनारायणापासून लक्ष्मणसिंह महाराजापर्यंत; व दुसरा तेथून पुढें श्रीप्रतापसिंह महाराजापर्यंत. सूर्यवंशाच्या पहिल्या भागास हिंगली, शेंदरी व आब्बाशी असे तीन रंग योजिले आहेत. हिंगळी सातारचे महाराजांचे वंशाचा; आब्बाशी जनकाचे वंशाचा; व शेंदरी श्राद्धदेव मनूचे १० पुत्रांस. सूर्यवंशाचे दुसरे भागास लक्ष्मणसिंहापुढें पहिले भागाप्रमाणेंच रंग आहेत. चंद्रवंशांत श्रीकृष्णाचा, पांडवांचा, व जरासंधाचा असे तीन पोटवंश मुख्य असून त्यांस अनुक्रमें अस्मानी, गुलाबी, व अबलक असे रंग योजिले आहेत. शिवाय ह्या वंशांत पिंवळा रंगही कांहीं ठिकाणीं घातला आहे.

वंशवृक्षाच्या विस्तारांत जागजागीं जी पौराणिक व ऐतिहासिक माहिती घातली आहे त्यावरून सूर्यवंशांत गुर्जर, राठोड, हडे (बुंदीवाले) कच्छवा (जयपूरवाले), झाले (कोटेवाले), कच्छभूजवाले, उदेपूर व नेपाळ इतक्या घराण्यांचा उदय असून, चंद्रवंशांत पौर (शिर्के), पवार, चव्हाण, यादव, (जाधव), वगैरे घराणीं उत्पन्न झालीं, असें दिसून येतें.

शेवटीं ह्या वंशवृक्षासंबंधानें आह्मांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं, 'चिटणिसी वंशावळ' ह्मणून जी वंशावळ इतिहासांत प्रसिद्ध आहे ती हीच होय. ह्याच वंशावळीवर इतर सर्वांपेक्षां अधिक विश्वास कां ठेवावयाचा ह्याबद्दल, पुणें येथें कुलकर्णी आणि मंडळीनें डेक्कन व्हरन्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीच्या विद्यमानें जें 'भारतवर्ष' ह्मणून मासिक पुस्तक काढिलें होतें त्याच्या पहिल्या वर्षाच्या ४।५।७।९ ह्या अंकांत सर्व बाजूंनीं पूर्ण विचार केला आहे.

भारतवर्ष मासिक पुस्तक दोन वर्षें चालून पुढें बंद पडल्यामुळें त्याचे प्रसिद्ध झालेले अंक पुष्कळांस दुर्लभ असतील, सबब शिवाजीच्या वंशावळीसंबंधानें ह्या मासिक पुस्तकांत आलेल्या ऐतिहासिक चर्चेतून कांहीं उतारे आमच्या वाचकांकरितां खालीं देतों.

## (उतारा १.)

### शिवाजीच्या भिन्नभिन्न वंशावळी.

| | टाड साहेबांची वंशावळ. | चिटणीसांची. | भिडे ह्यांची. | रा. ब. सानें ह्यांची. | आह्मीं तयार केलेली. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराणा लक्ष्मणसिंह. | ......... | शिवराव चितोडकर. | महाराणा लक्ष्मणसिंह. | इ. स. १२७५ राज्यारोहण. |
| १ | महाराणा लक्ष्मणसिंह. | ......... | ......... | भीमसिंह. | अजयसिंह. | इ. स. १३०३ त कैलवाडा प्रांतास गेले. |
| २ | अजयसिंह. | सजणसिंह. | सजणसिंह. | विजयभानु. | सजणसिंह. | इ. स. १३१० च्या सुमारास सोंधवाड्यास आले. |
| ३ | सजनसिंह. | दिलीपसिंह. | दिलीपसिंह. | खेलकर्ण. | दिलीपसिंह. | |
| ४ | दलीपसिंह. | सिंहजी. | सिंहाजी. | जयकर्ण. | सिंहजी. | |
| ५ | शिवजी.[१] | भोसाजी. | भोसाजी. | महाकर्ण. | भोसाजी. | |
| ६ | भोराजी.[२] | देवराजजी. | देवराजजी. | राजा शिव. | देवराज. | इ. स. १४१५ च्या सुमारांत दक्षिणेंत आले. |
| ७ | देवराजजी. | इंद्रसेन. | खेलकर्ण. | बावाजी. | इंद्रसेन (उग्रसन) | |

| | टाड साहेबांची वंशावळ. | चिटणीसांची. | भिडे ह्यांची. | रा. ब. सानें ह्यांची. | आह्मीं तयार केलेली. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | उग्रसेन. | | | | | |
| ९ | माहुलजी. | शुभकृष्ण | मालकर्ण. | | खेलकर्ण. | |
| १० | खेलोजी. | रूपसिंह. | बाबाजी. | | जयकर्ण. | हा टाड साहेबांचा जनकोजी नसेलना? |
| ११ | जनकोजी. | भूमिंद्र. | | | मालकर्ण. | हा टाड साहेबांचा माहुलजी (मालोजी) असावा. जन्म इ. स. १५३३ त. |
| १२ | सतुजी. (Suttooji) | धापजी. | | | संभाजी. | |
| १३ | संभाजी. | बरवठजी. खलकर्ण. (खलाजी) | | | बाबाजी. | |
| १४ | शिवजी (बाबाजी) | जयकर्ण. संभाजी. | | | | |
| १५ | | बाबाजी. | | | | |
| १६ | | (शिवजी) | | | | |

# (उतारा २.)

"सातारा येथील छत्रपतीच्या दप्तरांतून ज्या वंशावळी उपलब्ध झाल्या आहेत त्यांसच प्राधान्य देणें आह्मास सर्वस्वीं भाग आहे. कोल्हापूर येथील दप्तरांतील कागद उपलब्ध नसल्यामुळें त्यासंबंधानें कांहींच ह्मणतां येत नाहीं, व "कोल्हापूर ग्याझेटियर" मध्येंही ती माहिती मिळत नाहीं. तंजावर दप्तरांतून स्वतंत्र वंशावळ मिळण्याचा संभव नाहीं, परंतु येथील कागदपत्र पाहून हिके नामक इतिहासकारानें जी माहिती प्रसिद्ध केली आहे तींत सातारच्या दप्तरांतील माहितीसच सर्व महत्त्व दिलें आहे, त्या अर्थीं सर्व दृष्टीनें तीच माहिती ज्यास्त ग्राह्य समजली पाहिजे. इंग्रजी इतिहासांकडे पाहिलें तर ग्रांट डफ, स्कॉट वेरिंग, जनरल ब्रिग्ज, आणि सर बार्टल फ्रियर यांनीं शिवाजीच्या पूर्वजांचा थोडा बहुत उल्लेख केला आहे. परंतु त्यावरून संगतवार वंशावळ तयार करितां येणें कठिण आहे. फक्त टॉड साहेबांच्या इतिहासांत यासंबंधानें चांगली माहिती आहे. बाकीच्या इंग्रज ग्रंथकारांनीं व बहुतेक सर्व मुसलमानी 'तवारिख' कारांनीं शिवाजीस 'लुटारू अदमी' समजून त्याच्या पूर्वजांविषयीं क्षुद्रपणाचे लेख लिहिण्यास कमी केलें नाहीं! मराठी बखरीमध्यें चिटणीस, सभासद, चित्रगुप्त ह्यांच्या व बडोद्याच्या 'शिवदिग्विजय, व 'शिवप्रताप' वगैरे ज्या बखरी प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीं सर्वांत चिटणीसाच्याच बखरींतील माहिती भरंवशालायक समजणें भाग आहे. सभासदादि इतर बखरींत शिवाजीच्या पूर्वजांची माहिती, संगतवार वंशावळ तयार करण्यासारखी मुळींच दिलेली नाहीं, तेव्हां त्यांचा ह्या कामीं फारसा उपयोग नाहीं. भोरचे रा० भिडे यांनीं पंतसचीव साहेबांच्या आज्ञेवरून जो इतिहास प्रसिद्ध केला आहे तो अगदीं अपूर्ण व संक्षिप्त आहे; तेव्हां त्याचेंही ही वंशावळ सिद्ध करण्याच्या कामीं फारसें साहाय्य होणार नाहीं. तात्पर्य शिवाजीची वंशावळ खरी खोटी ठरविण्यास सर्व आधार सातारच्या दप्तराचाच घेतला पाहिजे आमच्या मतें त्यापेक्षां ज्यास्त विश्वासनीय पुरावा इतरत्र मिळणें अः आहे."

"आह्मांस साताऱ्च्या छत्रपतींच्या दप्तरांतून दोन वंशावळी मिळाल्या आहेत. पहिली वंशावळ साताऱचे सुप्रसिद्ध श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांनीं अनेक जुने कागद पाहून तयार केली. ह्या पाणीदार महाराजांस आपल्या पूर्वजांचा फार अभिमान असून जुन्या इतिहासाची अत्यंत अभिरुचि होती. साताऱचें क्षत्रिय घराणें सर्वांत श्रेष्ठ असें सिद्ध करून एक वेळ त्यांनीं उदेपूरच्या दरबारांतही आपली छाप बसविल्याचें ऐकिवांत आहे............................ह्या महाराजांनीं जी वंशावळ तयार केली आहे ती त्यांनीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांच्याकडेही पाठविली होती, व तेथेंही ती प्रमाणभूत ठरली गेली आहे."

वरील उताऱ्यांत सांगितलेली साताऱचे दप्तरांतील दुसरी वंशावळ ही साताऱच्या शेवटच्या महाराजांच्या थोरल्या राणी श्रीमती सगुणाबाई उर्फ आईसाहेब महाराज यांनीं विक्टोरिया महाराणी साहेबांस पाठविलेल्या अपिलांत दिलेली आहे. साताऱच्या दोन्ही वंशावळींत बहुतेक साम्य असून कोठें नांवामध्यें थोडेंसें अंतर आहे.

मु. कोल्हापूर,
ता. ८ माहे मे सन १९०५

म. ग. डोंगरे
प्रकाशक.

# परिशिष्ट.

## कोल्हापूर सरकारचा वंशवृक्ष.

### प्रस्तावना.

भोंसले कुळाचा उद्भव उदेपुरच्या 'शिसोदे' घराण्यापासून आहे. हें स्थापित करणारा जुना वंशवृक्ष शके १७५९ (इ. स. १८३७।३८) ह्या वर्षी साताऱ्यास तयार करण्यांत आला होता. ह्मणून त्यांत कोल्हापूरचे राजघराण्याचा विस्तार तत्कालीन श्रीशाहाजी उर्फ बुवासाहेब महाराजापर्यंत आलेला आहे. जुना वंशवृक्ष प्रसिद्ध करितांना, त्यामध्यें कोल्हापुरच्या राजघराण्याचा आजपर्यंतचा वंशविस्तार दाखवावा, असा आमचा प्रथम उद्देश होता. परंतु असें केलें असतां, मूळ वंशवृक्षाची असल बरहुकूम नक्कल राहिली नसती. सबब जुन्या वंशवृक्षांत बिलकूल फेरबदल न करितां, तो जसाचा तसाच छापिला आहे; व कोल्हापुरचा आजतागायतचा सर्व वंशविस्तार पुरवणी वंशवृक्षरूपानें देत आहों.

सदरहु वंशवृक्षातील प्रथम पुरुष बाबाजी राजे, सूर्यवंशाचा आदिपुरुष जो श्रीविष्णु नारायण त्यापासून १५३ वे पुरुष आहेत, हें जुन्या वंशवृक्षावरून तेव्हांच दिसून येईल. पुरवणी-वंशवृक्षाची समजूत नकाशाखालींच दोन चक्रांत दिली आहे, ती पहावी.

मु० कोल्हापूर,
ता० २५ सेप्टेंबर १९०५ इ०

महादेव गणेश डोंगरे,
प्रकाशक.

# श्रीसिद्धांतविजयग्रंथ.

क्र. ३२५

## उपोद्घात.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ १ ॥

(भगवद्गीता)

जगच्चालक परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें, महाराष्ट्रांत मराठी राज्याची संस्थापना झाल्यावर, शिवाजीमहाराज उदेपुरच्या 'शिसोदे 'राजकुलांतील ठरून, श्रीकाशीक्षेत्रस्थ गागाभट्टानीं त्यांना क्षात्रियोचित पद्धतीनें रायगडीं राज्याभिषेक केला, व भोंसलेकुळाच्या लुप्त झालेल्या क्षत्रियधर्माचें पुनरुज्जीवन केलें, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. करवीरचें राजघराणें हें शिवछत्रपतीच्या घराण्याचीच शाखा असल्यामुळें, त्या घराण्यांत वेदोक्त पद्धतीनें गृह्यकृत्यें अव्याहत चालत असतील असा आमचा समज कोल्हापुरचें ग्रामण्य उपस्थित होण्यापूर्वीं होता. सुमारें चार वर्षांपूर्वीं कित्येक राजोपाध्येप्रभृति आश्रित ब्राम्हणांनीं भोंसलेकुलोत्पन्न क्षत्रियकुलावतंस श्रीमन्महाराज श्रीशाहूछत्रपती स्वामींचे घराण्यांत वेदोक्त मंत्रांनीं कर्म करण्याचें नाकारिलें, तेव्हां भोंसल्यांचे मूळ ठिकाण सातारा येथील राजघराण्यांत वहिवाट कशी होती व सांप्रत कशी आहे, ही चौकशी करण्याकरितां आह्मी सातान्यास गेलों; व कै० आबासाहेबमहाराजांस ह्या बाबतींत समक्ष विचारितां त्यांनीं सांगितलें कीं, "आमच्या येथें वेदोक्त पद्धतीनेंच सर्व संस्कार होतात कारण आमचे चुलते कै० प्रतापसिंहमहाराज यांचे कारकिर्दींत वेदोक्तसंबंधानें इकडे ब्राह्मणांनीं बखेडा माजविला होता. पण कै० महाराजानीं आमच्या घराण्यास व आप्तस्वकियांस क्षत्रियत्वामुळें तीन कर्मांचा अधिकार आहे असें सिद्ध करून, पूर्ववहिवाटीप्रमाणें वेदोक्त कर्म चालू करून, तंट्याचा निकाल लावून टाकिला होता. ह्या ग्रामण्याचे कागदपत्रही आमच्या दप्तरांत आहेत."

कै० प्रतापसिंहमहाराजांच्या कारकिर्दीत साताऱ्यास मराठे—क्षत्रिय व ब्राह्मण ह्यांमध्यें वेदोक्तसंबंधानें तंटा लागून जें ग्रामण्य ७।८ वर्षे माजलें होतें, त्याचे कागदपत्र साताऱ्च्या दप्तरांत आहेत असें खुद्द कै० आबासाहेब महाराजांच्या तोंडून कळाल्यावर, त्यांस आह्मीं विनंती केली कीं, सरकारदप्तरीं ह्या ग्रामण्यासंबंधी जे कागदपत्र असतील ते आह्मास मिळावे, ह्मणजे करवीरास वेदोक्तासंबंधानें जो बखेडा पडला आहे तो मोडून राजघराण्यांतील गृह्यकृत्यें वेदोक्त पद्धतीनें पुन्हा चालूं लागतील. कै० महाराजानीं आमची विनंति मान्य करून, दप्तर चाळून उपयोगी ते कागदपत्र घेऊन जाण्याची परवानगी आम्हास व आमचे मित्र रा. रा. शंकर आपाजी गुप्ते बी. ए., एलएल. बी. यांस दिली, ह्याबद्दल कै० महाराजांचे आह्मी अत्यंत ऋणी आहों.

वर सांगितल्याप्रमाणें परवानगी मिळाल्यावर महाराजांचें खासगी दप्तर चाळण्यास सुरवात करून सुमारें चार महिन्यांत बरेच महत्वाचे कागद शोधून काढिले. त्यांपैकीं जे कागद आमच्या हातीं आले आहेत ते प्रसिद्ध करून, मराठ्यांच्या इतिहासाचे साधनांत नवीन भर घालीत आहों. मराठ्यांचा इतिहास अद्याप पूर्णपणें तयार झालेला नाहीं. ह्या सांखळीच्या कित्येक कड्यांचा अद्यापपावेतों पत्ताच नाहीं. एखाद्या देशाचा इतिहास ह्मटला म्हणजे त्यांतील नुसत्या लढायांचीं वर्णनें किंवा तहांच्या शर्तींच्या याद्या नव्हेत. इतिहास ह्मटला ह्मणजे त्यांत तद्देशियांची राजकीय, सामाजिक, धार्मिक, व व्यावहारिक माहिती यावयास पाहिजे. मराठे ह्मणविणारांत अनेक जाती व पंथ आहेत; तेव्हां मराठ्यांच्या इतिहासांत त्या जातींची व पंथांची वर सांगितलेल्या सर्व प्रकारची विश्वसनीय माहिती नमुद झाली पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहूं जातां, महाराष्ट्रांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर द्विजातींमध्यें धार्मिक व सामाजिक हक्कांसंबंधानें तंटे होऊन, त्यांचा देशावर जो वाईट परिणाम झाला तो कळून येण्यासाठीं, ग्रामण्यांच्या इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध झालीं ह्मणजे भावी इतिहासकारांस त्यांचा उपयोग होईल, ह्या समजुतीनें सदरहु कागदपत्र आह्मी प्रसिद्ध करीत आहों.

ग्रामण्यें ह्मणजे सामाजिक बाबींत झालेले आपापसांतील तंटे होत. तेव्हां जुन्या ग्रामण्यासंबंधाचे कागद प्रसिद्ध करून, ज्यांचा लोकांस विसर पडला आहे असे जुने तंटे पुनरपि उपस्थित करून, समाजांत दुही माजविण्याचें निंद्य कृत्य आह्मी करीत आहों. असा कित्येकांचा आह्मावर दोषारोप होईल. त्यास उत्तर असें, कीं इंग्लंद वगैरे देशांत राजकीय हक्कांसाठीं राजा आणि प्रजा ह्यांच्यामध्यें अनेक युद्धें झालीं त्यांचा, किंवा प्राटेस्टंट व रोमन क्याथोलिक ह्या दोन धर्मपंथांच्या लोकांनीं एकमेकांचा जो छल केला त्याचा, इतिहास चालू पिढीनें लिहूं-वाचूं नये असें कोणी ह्मणेल, असें आह्मास वाटत नाहीं. हें एक कारण झालें; पण ह्याशिवाय दुसरें एक महत्वाचें कारण आहे त्याचा आतां विचार करूं.

प्राचीन कालीं हिंदुसमाजाचे वर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) आपापल्या धर्माप्रमाणें वागून एकमेकांचा द्वेष न करितां आपापल्या व्यवसायांत गढलेले असत; व पाहिजे त्या मनुष्यास पाहिजे त्या वर्णांत स्वकर्मानें शिरण्याची मुभा होती; पण अशा उदात्त तत्वावर केलेली ही समाजरचना हळू हळूं बदलत जाऊन, खालच्या वर्णांतील मनुष्यास वरच्या वर्णांत जातां येईनासें झालें-ह्मणजे वर्णांच्या जाती झाल्या; व क्रमाक्रमानें प्रत्येक वर्ण-जातीचे अनेक पोटभेद होऊन, प्रस्तुत हिंदुसमाजांत असंख्य जाती निर्माण झाल्या असल्यानें, एकंदर राष्ट्राची अगदीं निकृष्टावस्था झालेली दृष्टोत्पत्तीस येत आहे.

प्रथम ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन उच्च जातींमध्यें वैमनस्य पडून, ब्राह्मण क्षत्रियांचा पाडाव करण्याच्या उद्योगास लागले. एखाद्या जातीचा नायनाट करण्याचे दोन मार्ग आहेत—(१) शरीरवध, किंवा (२) नीचतर जातींत समावेश. ह्यापैकीं पहिल्या मार्गानें क्षत्रिय जातीचा नाश करणें ब्राह्मणजातीस शक्य नसल्यामुळें, ह्यांनीं दुसऱ्या मार्गाचा अवलंब करून, क्षत्रियांचें वैदिककर्म हिरावून घेऊन, त्यांस शूद्र बनविण्याचा प्रयत्न सुरू केला. हिंदुधर्माप्रमाणें ब्राह्मणास अध्ययन, यजन, दान, अध्यापन, याजन व प्रतिग्रह ह्या सर्व कर्मांचा अधिकार असून,

क्षत्रियवैश्यांस मात्र पहिल्या तीन कर्मांचाच फक्त अधिकार आहे. त्यामुळें ह्यांचें सर्व संस्कार ब्राह्मण उपाध्यायांचे हातून व्हावे लागतात; क्षत्रियवैश्यांच्या हातून होऊं शकत नाहींत. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें ब्राह्मणांस वाटेल तेव्हां क्षत्रियांचीं गृह्यकृत्यें बंद पाडून ग्रामण्य माजवितां येतें. त्यांत आणखी राजबळ असलें ह्मणजे ग्रामण्यें फारच जोरदार असतात. महाराष्ट्रांत शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाचे वेळीं जें ग्रामण्य ब्राह्मण, व चांद्रसेनीय कायस्थ प्रभु व क्षत्रिय मराठे ह्यांमध्यें उत्पन्न झालें होतें ते लवकरच विझून जिकडे तिकडे स्वस्थता झाली. पण पेशवाई झाल्यावर (शाहूमहाराजानंतर) जीं ग्रामण्यें ब्राह्मण व चां० का० प्रभु जातींमध्यें झालीं, तीं जोरदार असून उभयतांमध्यें फारच द्वेष वाढविणारीं होतीं. श्री० बाळाजी बाजीराव व त्यांचे पुत्र श्री० माधवराव यांचें पाठबळ कोणत्याही ग्रामण्यास नसे. परंतु पुढें जीं ग्रामण्यें झालीं, त्यांत कित्येक ब्राम्हण सरदारांचें व मुत्सद्यांचें अंग असल्यामुळें, ब्राह्मणांशीं टक्कर मारून आपल्या धार्मिक हक्कांचे संरक्षण करण्याचे कामीं चां० का० प्रभूंस आपली पराकाष्ठा करावी लागली. ("चां० का० प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें" पहा).

सांप्रत जगदीशकृपेनें इंग्रजसरकारचें साम्राज्य हिंदुस्थानांत सर्वत्र झालें आहे, व चहूंकडे शांतता असून जगांतील सर्व ज्ञानभांडार कोणासही खुलें आहे. मागासलेल्या जातींच्या लोकांस विद्यामृत पाजून, त्यांचा उद्धार करण्याची सुबुद्धि इंग्रजप्रभूमध्यें वास करीत असल्यामुळें, त्या जातींचें पाऊल पुढें पुढें पडूं लागलें आहे. अशा काळीं ब्राह्मणांनीं आपल्या पूर्वजांच्या चुका (इतर जातींचा धर्मछल) समजून घेऊन, त्या पुन्हा न होऊं देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. पण तसें न होतां, प्रस्तुतच्या पालटलेल्या मनूतही ग्रामण्यांचें खूळ पिकावें, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. ब्राह्मणजातीचें बुद्धिवैभव फार मोठें असून त्यांत कित्येक अत्यंत उदार मनाचे महात्मे आहेत, व त्यांच्या ठिकाणीं इतर जातींविषयीं बिलकूल द्वेष नसून ते केवळ देशहितासाठीं झटत असतात, ह्या गोष्टी आह्मास अगदीं कबूल आहेत; पण ब्राह्मणजातींतील बहुजन-

समाज उदार तत्वांचा अंगिकार करण्यास तयार आहे असें दिसून येत नाहीं. ह्या बहुजनसमाजाचे दोन वर्ग पडतात: —(१) जुन्यास चिकटून राहणारे पण सत्याची चाड असणारे, व (२) अविचारी व दुरभिमानी. पहिल्या वर्गांतील लोकांची खात्री झाली, कीं एखाद्या जातीस वेदोक्त पद्धतीनें गृह्यकृत्यें करण्याचा अधिकार शास्त्रानें किंवा रूढीनें आहे, तर हे लोक त्या जातींच्या धार्मिक हक्कांची पायमल्ली करूं इच्छिणार नाहींत. अशा लोकांस 'कित्येक मराठे शुद्ध क्षत्रिय असून त्यांस वैदिक कर्माचा अधिकार आहे' हें दाखविण्याच्या हेतूनें आह्मी सदरहु कागदपत्र प्रसिद्ध करीत आहों.

ह्यांशिवाय आणखी एक तिसरें कारण आहे तें असें, कीं फार दिवसाच्या वहिवाटीमुळें किंवा अज्ञानामुळें क्षत्रिय मराठ्यांस आपल्या धार्मिक व सामाजिक हक्कांची माहिती नसते; ती माहिती त्यांस होऊन त्यांनीं आपल्या वरील प्रकारच्या हक्कांस जपूं लागावें.

मराठी राज्याची स्थापना झाल्यावर, सन १६७४ सालीं शिवाजी-महाराजांनीं आपणास राज्याभिषेक करून घेण्याची इच्छा दर्शविली असतां, 'क्षत्रियाशिवाय राज्याभिषेक होत नाहीं' अशा शास्त्रार्थावरून शिवाजीमहाराज क्षत्रियकुलोत्पन्न ठरल्याशिवाय राज्याभिषेक करण्याचें दक्षिणी ब्राह्मणांनीं नाकारिलें. ह्याच सुमारास चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या क्षत्रियत्वाविषयीं दक्षिणी ब्राम्हणांनीं शंका घेऊन त्यांच्याकडील कर्में बंद केलीं होतीं. बाळाजी आवजी चिटणीस चां० का० प्रभु, यांनीं पुढाकार घेऊन, उदेपुरास जाऊन, तेथील राणाजीची खात्री करून दिली, कीं "अजयसिंह महाराण्यानें हमीरसिंग पुतण्यास मेवाडची गादी दिल्यामुळें, त्यांचे पुत्र सजनसिंहजी रुसून दक्षिण देशीं गेले हाते, त्यांचेच वंशज शिवाजीमहाराज असून, 'भोसाजी' वरून त्यांचें कुळास 'भोंसले' असें दक्षिणी नांव पडलें आहे." (टाडचें राजस्थान, बुक पहिलें, पान २२९; परि० ४, पा० ८१; परि० ४, पा० ९६।९७; परि० ९, पा० १३१). राजपुतान्यांत जीं क्षत्रिय घराणीं आहेत, त्यांमध्यं मेवाडचें घराणें अगदीं पहिल्या प्रतीचें मानलें जातें; कारण उदे-

पुरचें सिंहासन हें अयोध्याधीश श्रीरामचंद्राचे वडील पुत्र लवराज ह्यांच्या वंशजानें राजपुतान्यांत मिळविलेलें आहे (परि० ४, पा० ८६). जोधपुर, जयपुर इत्यादि मोठमोठ्या रजपुत राजांनीं आपल्या मुली मुसलमान बादशाहास दिल्या; पण मेवाडच्या म.नी राजघराण्यानें आपली मुलगी कधींही मुसलमानास दिली नाहीं इतकेंच नाहीं, तर ज्यांनीं दिल्या होत्या त्यांच्याशीं शरीरसंबंध करण्याचें सोडून दिलें (टाड). तेव्हां शिवाजीमहाराजांचें भोंसलेकुल शिसोदे—वंशाची खरोखर शाखा आहे, अशी पक्की खात्री झाल्याशिवाय उदेपुरच्या राणाजींनीं महाराजांचें क्षत्रियत्व कधींही कबूल केलें नसतें, व त्यांची वंशावळ राणाजीच्या वंशावळींत दाखल (परि० ९, पा० १३१) झाली नसती.

दक्षिणेंतील भोंसलेकुलाचा उदेपुरच्या शिसोदेकुलांशीं संबंध लागल्यावर श्रीकाशीक्षेत्रस्थ गागापंडित दक्षिणेंत येऊन रायगडीं महाराजांस क्षत्रियोचित पद्धतीनें राज्याभिषेक करिते झाले, हें स्वाभाविकच आहे. ह्यावर कित्येकांचा पूर्वपक्ष असा आहे कीं, 'शिवाजीमहाराज क्षत्रिय ठरले तर त्यांस दक्षिणी पंडितानीं राज्याभिषेक कां केला नाहीं'? ह्याचें उत्तर असें, कीं एकतर दक्षिणी पंडित 'कलींत क्षत्रिय मुळींच नाहींत; कारण परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली' असें ह्मणून त्यास चिकटून राहाणारे अरण्यपंडित! तेव्हां ते मेवाडच्या शिसोद्यांस तरी कोठें क्षत्रिय मानितात? त्यांच्या मतें, कलींत काय ते ब्राह्मण व शूद्र असे दोनच वर्ण!

दुसरें कारण असें दिसतें, कीं काशी म्हणजे हिंदुविद्वत्तेचें माहेरघर. तेथें देखील तत्कालीन पंडितांमध्यें गागापंडित अग्रणी होते. करितां अशा मोठ्या जाड्या पंडिताकडून राज्याभिषेक करून घेण्यानें दक्षिणी ब्राह्मणांचीं तोंडें सहजच बंद होतील, असें शिवछत्रपतीस वाटलें असावें.

कित्येक लोकांचें म्हणणें आहे, कीं ,गागाभट्टाला शिवराजानें एक लाख रुपये दक्षिणा देण्याचें कबूल केलें, म्हणून त्यांनीं येऊन राज्याभि-

षेक केला. आह्मी ही शंका घेणारास विनयपूर्वक विचारितों, कीं गागाभट्टाला किती दक्षिणा दिली असती ह्मणजे 'तो फितला' असें आपण ह्मटलें नसतें? दोन अडीशें वर्षांपूर्वी, काशीसारख्या दूरच्या ठिकाणाहून दक्षिणेंत येऊन, तेथील ब्राह्मणांची शास्त्रार्थाबद्दल खात्री करून देऊन, मराठ्यांच्या सार्वभौम राजाला राज्याभिषेक केल्यावर, उपनयन करून गुरुपदास पावलेल्या गागापंडितास जर एक लाख रुपये दक्षिणा मिळाली तर तो लांच ठरतो काय? मल्हारराव गायकवाडावरील खटल्यांत सार्जंट व्यालंटाईन यांस एक लाखावर (दहाहजार गिनी) फी देण्यांत आली होती. एखाद्याची मिळकत अन्यायानें दुसऱ्याच्या घरांत जात असतां, कोणता वकील आपली भरपूर फी मिळाल्याशिवाय अडचणी सोसून, दूरच्या गावीं जाऊन खटला चालवील? गागाभट्ट लांच घेऊन वेदोक्तकर्म करण्यास तयार झाला असें जर असतें, तर वे० शा० रघुनाथपंत ह्मणमंते पंडितराव व इतर दक्षिणी ब्राह्मण महाराजांकडे वेदोक्त कर्म चालू ठेवितेना. ह्यांजवरून त्यावेळच्या दक्षिणी ब्राह्मणांची गागापंडितानें महाराजांच्या क्षत्रियत्वाविषयीं खरोखर खात्री करून दिली व ह्मणूनच त्यांनीं नवीन पद्धति स्वीकारिली, असें ह्मणावें लागतें. शिवछत्रपतीला शूद्र ठरवूं पाहाणाऱ्या लोकांस आह्मी असें विचारितों कीं, भोंसल्यांचें घराणें शुद्ध क्षत्रिय नसतें, तर रामदासस्वामींनीं शिवाजीमहाराजांच्या हातून अधर्म होऊं दिला असतां काय? व स्वामींनीं निषेध केल्यावर महाराज आपणास राज्याभिषेक करून घेते काय?

शिवछत्रपतीस राज्याभिषेक झाल्यावर, चिटणिसांच्या विनंतीवरून क्षत्रियांस आपला धर्म समजावा ह्मणून, 'कायस्थ–धर्म–प्रदीप' नांवाचा संस्कृत ग्रंथ गागाभट्टानीं करून दिला, तोच ग्रंथ "गागाभट्टी" ह्या नांवानें प्रसिद्ध होता. श्री. बाजीराव रघुनाथ पेशवे यानीं वे. शा. आबाशास्त्री टकले, चा. का. प्रभूंचे कुलोपाध्ये, यांस २६ जिलकाद सु॥ समान तिसैन मया व आलफ (इ. स. १७९८) तारखेचें पत्र पाठवून आज्ञा केली होती, कीं "पेणकर ब्राह्मणांनीं प्रभूंकडील कर्मे बंद केलीं आहेत तीं गागाभट्टी-प्रमाणें पुन्हा चालू करण्यास दिक्कत बाळगूं नये." हीच 'गागाभट्टी'

मुंबईस कंपनीसरकारच्या गव्हरनराकडे दाखल्याकरितां सातारच्या प्रभूमंडळीनें पाठविली होती. पण बाजीरावसाहेबांची आज्ञा गागाभट्टप्रमाणें कृत्यें चालवावींत अशी झाल्यावर, नवीन ग्रंथरचना करून (परि ६, पत्र ९) लबाडीची 'गागाभट्टी' पुढें करण्यास विघ्नसंतोषी ब्राह्मणांस कितीसा वेळ लागणार? वाईकर लेलेशास्त्री जी गागाभट्टी त्यांच्याजवळ आहे म्हणून ह्मणतात ती लबाडीची होय.

संभाजी व राजाराममहाराजांच्या मुंजी शिवाजीमहाराजांच्या कारकिर्दीतच वेदोक्त मंत्रांनीं झाल्या असल्या पाहिजेत. राजाराममहाराजांचे निधनानंतर मा. ताराबाईसाहेबानीं आपला मुलगा शिवाजी याची मुंज करून राज्याभिषेक करण्याविषयीं रामचंद्र नीलकठ आमात्य यांस आग्रह केला, तेव्हां शाहूची सुटका झाल्यावर दोघांच्या मुंजी एकदम कराव्या, असा सल्ला रामचंद्रपंतानीं दिला; पण ताराबाईसाहेबानीं तें न ऐकतां, आपल्या पुत्राची मुंज करून त्यास पन्हाळगडावर राज्याभिषेक करविला (सरदेसाईकृत 'मराठ्यांची रिसायत;' पानें ५११ व ६६४). पुढें शाहूमहाराज मोंगलांच्या कैदेंतून सुटून दक्षिणेंत आल्यावर त्यानीं आपली गादी लढून मिळविली, व सन १७०८ च्या ज्यानेवारींत सातान्यास येऊन व्रतबंधपूर्वक **यथाविधि** आपणास मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करविला (म. रिया.; पा. ५७४)

ह्यावरून शाहूमहाराजापर्यंत शिवछत्रपतीनें घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें उपनयन व राज्याभिषेक हे संस्कार होत होते, ह्याबद्दल शंका राहत नाहीं

आपल्यामागें आपल्या गादीवर उदेपुरचा कोणी राजपुत्र बसल्यास मराठी राज्याची थोरवी वाढेल, असें शाहूमहाराजांस वाटल्यावरून, त्यानीं नाथजी राजपुत्रास दक्षिणेंत पाठवून द्यावें ह्मणून उदेपुरास कारकुनांबरोबर पत्रें पाठविलीं होतीं (परि. ४, पा. ८४; परि. ४, पा. १०१; टाड, बु. १, पा. २२५); परंतु उदेपुरचा कोणी राजपुत्र वेळेवर येऊन पोंहोचणार नाहीं असें महाराजांस वाटल्यावरून, ताराबाईसाहेबांचे नातु रामराजे यांस दत्तक घेण्याचें ठरवून, कांहीं अटींवर त्यांनीं सर्व राज्य पेशव्यांचे स्वाधीन करून दिलें. दत्तक रामराजांची मुंज व राज्याभिषेक पूर्ववहिवाटीप्रमाणें

झाल्याबद्दल जरी खात्रीलायक पुरावा आह्मापाशीं नाहीं, तरी श्री. नानासाहेबासारखे धोरणी पेशवे राजघराण्याच्या कुलपरंपरेच्या आड येऊन, वेदोक्त कर्मास हरकत घेणारे खास नव्हते, असें चां. का. प्रभूंच्या इतिहासावरून दिसतें. शिवाय, शाहूमहाराजानीं सनद करून पेशव्यास राज्य दिलें, ह्यावद्दल जुन्या मराठे सरदारांस वैषम्य वाटलें होतें. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं छत्रपतीच्या धार्मिक हक्कांस अडथळा करून, मराठे सरदारांस बिथरविण्याइतकें आत्महितघातकी धाडस दाखविणें पेशव्यांस इष्ट नव्हतें.

इ. स. १७७७ सालीं रामराजामागें दुसरे शाहूमहाराज (आबासाहेब) दत्तक झाले. त्यावेळीं श्री. सवाईमाधवराव केवळ बालक असून प्रसिद्ध नानाफडणविसांच्या मुत्सदगिरीस चांगलें नांवरूप येत चाललें हातें. सातारचे महाराज मराठे सरदारांच्या नादीं लागून पेशव्याविरूद बंड करतील अशी भीति नानाफडणविसास असल्यामुळें, महाराजांनां सकुटुंब सपरिवार सातारच्या किल्ल्यावर कैदेंत ठेऊन, बाबुराव कृष्णासारख्या आपल्या विश्वासु सेवकाकडे साताराप्रांताची सुभेदारी—कोणाच्या मतें राजघराण्यांतील कैद्यांववरची जेलरी—दिली होती. आबासाहेबमहाराजांची मुंज पुराणाक्त विधीनें किल्ल्यावर करण्यांत आलीं; व ह्या अप्रतिम कामगिरीबद्दल सुभेदारास फडणविसाकडून शाबासकी देण्यांत आली ती अशी, कीं "श्रीमंत महाराजांची मुंज वद्य पंचमीस पुराणोक्त विधी करून, बाईसाहेबास सतोष वाटून जाहली, ही गोष्ट तुम्ही फारच उत्तम केली" (परि. ९, पत्र ५). ह्यावरून पुराणोक्त मुंज होण्यापासून बाईसाहेबांस (महाराजांच्या मातुश्रीस) दुःख किंवा खेद होण्याचा संभव होता; पण सुभेदारानीं बाईसाहेबास पुराणोक्त मुंजीमुळेंच सतोष वाटावयास लाविलें (पोलिशी समजून देऊन कीं काय न कळे,) व ह्याबद्दल नानाफडणविसास धन्यता वाटली, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आह्मास असें वाटतें कीं, पुराणोक्त मुंजीची वहिवाट सातारच्या राजघराण्यांत नानाफडणविसानीं नवीनच पाडून, अविचारी व मत्सरी ब्रह्मवृंदाकडून पाठ थोपटून घेतली असावी.

दुसऱ्या शाहुमहाराजामागून त्यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. प्रतापसिंहमहाराज सन १८०८ सालीं सातारच्या गादीवर बसले. ही वेळ रावबाजीच्या

अगदीं भरभराटीची असून, नानाफडणविसाची जागा त्रिंबकजी डेंगळे ह्या मुत्सद्यानें पटकाविली होती; व सातारच्या राजघराण्यावर त्रिंबकजीची त्रीतीय नेत्रानें सारखी नजर होती. मग काय विचारावें? ह्या पेशव्याच्या कारकिर्दींत सातारच्या राजघराण्याची इतकी दुर्दशा झाली, कीं ती ऐकून किंवा प्रत्यक्ष पाहून डोळ्यांस पाणी न येणारा साऱ्या हिंदुस्थानांत एक बाजीराव व दुसरा त्रिंबकजी!

बाजीराव पेशव्यांचा ग्रंथ आटोपून त्यांची रवानगी ब्रह्मवतास झाली व वासोटाकिल्ला कंपनीसरकारनें सर करून घेतला, तेव्हां त्या किल्ल्यावर सातारचे महाराज व दुसरीं राजघराण्यांतील माणसें कैदेंत होतीं, तीं सारीं कंपनीसरकारच्या हातीं सांपडलीं. पण महाराजाकडे कांहीं अपराध नाहीं अशी खात्री झाल्यावर, कमिशनरसाहेबानें मोठ्या थाटानें श्रीप्रतापसिंहमहाराजांस सातारच्या गादीवर बसविलें. त्यावेळीं, बाजीराव पेशव्यानें आपला व आपल्या माणसांचा छळ कसा केला, हें जाहिरनामा काढून महाराजांनीं प्रसिद्धपणें सर्व जगास कळविलें. ह्या जाहिरनाम्यामध्यें असा मजकूर होता, कीं वासोटयाच्या किल्लेदारास पेशव्याचा हुकुम होता, कीं किल्ला पडण्याची वेळ आल्यास, महाराज व इतर राजघराण्यांतील मनुष्यांस मारून टाकावें, पण इंग्रजांच्या हातीं लागूं देऊं नये. (ग्र्यांट डफचा इतिहास, बुक तिसरें, पान ३४४)

अशा रीतीनें पेशव्याची कैद सुटून कंपनीसरकारच्या मेहरबानीनें श्रीप्रतापसिंहमहाराजास सातारचें तख्त पुनरपि मिळालें, तरी राज्यकारभाराची सर्व मुखत्यारी मिळाली नव्हती. संस्थानचा कारभार चालविण्यासाठीं राजमंडळाची (Council of Administration) नेमणुक कंपनीसरकारानें करून, त्याचें अध्यक्षत्व पोलिटिकल एजंटसाहेबाकडे दिलें होतें; व खाजगी कडील व्यवस्थेची पूण मुखत्यारी महाराजास दिली होती.

ह्याप्रमाणें स्वस्थता झाल्यावर महाराजानीं आपलें व आपल्या आप्तस्वकियांच्या धार्मिक हक्कांचें पुनरुज्जीवन करण्याचा निश्चय केला. राज-

३२५

पुतान्यांत व मुख्यत्वेंकरून मेवाडांत क्षत्रियांची वहिवाट कशी आहे, व उदेपूर व सातारा येथील घराण्यांच्या वंशावळींची मिळवणी कशी झाली, वगैरे माहिती मिळविण्याकरितां चतुरसिंग भोसले व बापू कान्होबा फडणीस आमात्य ह्या उभयतांस कंपनीसरकारच्या रेसिडेंटाचें पत्र देऊन, शके १७४१ (इ. स १८१९।२०) सालीं उदेपुराकडे पाठविलें होतें. उदेपुरास गेल्यावर बापूनीं महाराजांस पत्र पाठवून कळविलें, कीं “राणाजीचें दर्शन जाहलियावर बोलणें जाहलें; त्यांत वंशावळीचें कारण त्यांनीं दाखविलें नाहीं, व आम्हीं लिहून दिलें नाहीं. सातारियांचे महाराज सिसोदे हे आपले घराण्यांतील असे ते समजूनच आहेत” (परि० ४, पत्र १).

पुढें शके १७४४ (?) सालीं **दीपविजय** कविराज (भाट) बाहादर उदेपुराहून दक्षिणेंत आले होते, त्यांचा सन्मान करून महाराजांनीं त्यांस विचारिलें, कीं ‘श्रीमन्महाराज शाहूछत्रपती (दुसरे) आमचे वडील यांचे जे पूर्वज चितोरउदेपुराहून दक्षिणदेशास आले त्यांचें चरित्र आम्हांस सांगावें; कारण बाबजीराजामागील माहिती इकडे नाहीं.’ त्यानंतर कविराजानें आपल्या पुस्तकावरून उदेपूर, सातारा, आनागोंदी, कोल्हापूर चंदीचंदावर (तंजावर), नागपूर, जितीगांव, देऊळगांव व अक्कलकोट इत्यादि ठिकाणच्या मुख्य वंशावळी सांगितल्या (परि० ४, पा० ८६). ह्या वंशावळींची टाडच्या हकीकतीशीं तुलना करून पाहतां, पुरुषांचीं नांवें व त्यांच्यासंबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी जमतात; पण सन-शक जमत नाहींत. येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं टाडसाहेबानें अनेक वंशावळी परस्परांशीं ताडून पाहून, त्यावरून साहेबास जो इतिहास सर्वांत अधिक सयुक्तिक व संभवनीय वाटला, तोच त्यांनीं आपल्या ग्रंथांत दाखल केला आहे. दीपविजय कविराज सन १८२२।२३ (शके १७४४) सालीं दक्षिणेंत आले होते; व साहेबाचा ग्रंथ स० १८२९ मध्यें इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाला आहे. तेव्हां कविराजाची हकीकत डाटच्या हकीकतीशीं तंतोतंत जमती, तर ती ह्या पुस्तकावरून कोणी उतरून घेऊन तिच्यावर मागला सन मुद्दाम घातला आहे, असें वाटण्याचा संभव होता.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु व ब्राह्मण ह्या जातींमध्यें पेशवाईंत बरींच ग्रामण्यें झालीं होतीं, हें मागें सांगितलेंच आहे. अशा प्रकारचें आणखी एक ग्रामण्य, पेशवाई बुडाल्यानंतर श्री० चिंतामण पाडुरंग पटवर्धन सांगलीकर यांनीं पुढाकार घेऊन, बाळाजीपंत नातु पुणेकर व नीळकंठशास्त्री थत्ते यांच्या मदतीनें, आपणास पाहिजेत तसे नवे ग्रंथ सांगलीस तयार करून घेऊन ( परि० ६, पत्र ९ ), सन १८२५ च्या सुमारास सातारा प्रांतीं उभें केलें होतें. त्यावेळीं बळवंतराव मल्हार चिटणीस सुमंत, चा० का० प्रभु, यांनीं करवीरमठाधीश्वर श्रीमत् शंकराचार्यांस विनंती केली होती कीं ‘ब्राह्मण आमच्या कर्मांस विनाकारण अडथळा करून तंटा करीत आहेत, ह्याचा बंदोबस्त व्हावा.’ त्यावरून स्वामींनीं सर्व ब्रह्मवृंदास आज्ञा केली, कीं ‘पूर्वींपासून जसें चालत आलें आहे तसें चालवावें; तंटा कोणी करू नये.’ परंतु ‘आह्मी ह्मणतों तसा ठराव स्वामी करतील तर तो आह्मांस मान्य आहे’ असें ह्मणणारा ब्रह्मवृंद ह्या वरील ठरावास थोडाच जुमानणार होता! माहुली वगैरे क्षेत्राच्या ब्राह्मणांनीं चिंतामणराव सांगलीकरास श्रीमंताचे ( पेशव्याचे ) ठिकाणीं स्थापून, चा० का० प्रभूंस शूद्र बनविणाऱ्या राष्ट्रीय कामावर त्यांची नेमणुक केली ( परि० ६, पत्र २ ). सांगलीकरांनीं पाहिलें, कीं शंकराचार्यांस सामील करून घेतलें असतां, आपलें काम श्रीगणपतीच्या कृपेंकरून निर्विघ्नपणें पार पडेल; पण आपल्या अधिकाराचा बोज राहावा असें स्वामीस वाटत असल्यामुळें ते सांगलीकरांच्या कटांत येईनात. तेव्हां स्वामीस बागुलबोवा दाखवून, त्यांस आपल्या मुठींत आणून, त्यांच्याकडून आपणास पाहिजे त्या मतलबाची परभूंविरुद्ध यादी सहीशिक्क्यानिशीं शके १७४७ सालीं पर्वतीमुकामीं करून घेतली; व पुढें दोन वर्षांनीं ( शके १७४९ ) त्या यादीच्या नकला सर्व देशभर ७९ ( पंचाहत्तर ) ठिकाणीं पाठवून, परभूलोकांस शूद्र बनविण्याचे कामास चांगलीच सुरवात केली ( परि० ६, पत्रें ६ व ११ ). ह्या यादीच्या प्रत्येक नकलेबरोबर श्रीशंकराचार्य स्वामींच्या नांवचें एकेक पत्र जोडलें होतें ( परि० ६, प० २ ). नीलकंठशास्त्र्यांनीं देखील परभूंविरुद्ध झालेल्या दोन सभांचा ठराव व श्रीशंकराचार्यांच्या यादीची माहिती माहुलीच्या समस्त ब्रह्मवृंदास देऊन, सांगलीकरापेक्षां

आपण कमी नाहीं असें दाखविलें ( परि० ६, पत्र ४ ). बाळाजीपंत नातु मात्र ब्रह्मवृंदास पत्रें, याद्या वगैरे लिहिण्याच्या भानगडींत न पडतां, श्रीशंकराचार्यास पकडींत धरून बसले होते ( परि० ६, पत्र ११. ).

ह्याच ग्रामण्यासंबंधी जे कागद बडोद्यास आहेत, त्यामध्यें श्रीजगद्गुरुशंकराचार्य मठश्रृंगेरी यांचा असा ठराव आहे कीं, सांप्रत क्षत्रियांचें अस्तित्व असून, त्यांस वैदिक कर्माचा अधिकार आहे.' ह्याच ठरावांत पूर्वीच्या क्षत्रियांचा उल्लेख असून त्यांचा संबंध विजयनगरचे प्रख्यात रामराजे किरिटी, व श्रीशिवाजीमहाराज व त्यांचे आप्तस्वकीय यांच्यापर्यंत लाविला आहे; व हे अस्सल क्षत्रिय असून वेदाधिकारी असल्याबद्दलहि सदरहु ठरावांत उल्लेख आहे ( विर्जेकृत 'क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व,' पा० १९६ ). हा अस्सल ठराव आम्हीं बडोद्याहून पाहण्यास मागितला आहे; व तो आमचें छपाईचें काम पुरें होण्यापूर्वी हातीं आल्यास, परिशिष्ट १२ ह्या रूपानें शेवटीं छापणार आहों.

ह्यानंतर चिटणीसप्रभृति परभुमंडळीची खात्री होऊन चुकली, कीं आतां श्रीशंकराचार्य किंवा ब्राह्मण ह्यांच्यावर भरंवसा ठेवून बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं; आपले संस्कार वेदमंत्रांनीं स्वतःच करूं लागल्याशिवाय निभाव नाहीं. असा विचार करून प्रभु—मंडळीनें शके १७४९ सालीं ( शंकराचार्यांची प्रभुविरुद्ध यादी निघाल्यावर ) साताऱ्यास सभा भरवून ठराव केला, कीं "काशीचे विद्वान ब्राह्मणांचीं, पेशव्यांची व राजांचीं पत्रें असतांही तीं न जुमानतां, ब्राह्मण वारंवार तंटे करून आमच्याकडील कर्में बंद पाडितात; सभा भरवून तोंडास येतील तीं दुर्भाषणें बोलतात; आमच्याकडे जे ब्राह्मण कर्में करीत असतील त्यांचा छळ करितात; आपण पाहिजे ते नवे नवे प्रकार जातींत सुरू करितात; पण आह्मांस आमच्या धर्मानें देखील वागूं देत नाहींत; आमची जात बुडवूं पाहत आहेत; आह्मीं आजपर्यंत त्यांची गरज ठेविली, पण ह्यापुढें आपलीं गृह्यकृत्यें स्वतःच करूं लागावें वगैरे" (परि०६, पा० ११० ). व चिटणिसांनीं देखील तासगांव, मिरज, करवीर, शाहापुर, बेलगांव इत्यादि ठिकाणच्या प्रभुमंडळीस साताऱ्याच्या सभेचा ठराव कळवून, तसें वागविण्याविषयीं

विनंती–यादि पाठविली (परि० ६, पा० ११); व ठरावाप्रमाणें वागण्याचें आपल्या लोकांस धैर्य यावें ह्मणून स्वतः अग्निहोत्र घेतलें. चिटणिसानीं (परभूनें) अग्निहोत्र घेतलेलें पाहून व ऐकून महाराष्ट्रांत ब्रह्मवृंदात हाहाकार उडाला. हिंदुधर्म बुडाला! प्रळयाची वेळ आली!! असें हिंदुधर्माभिमान्यांस वाटून त्यांनीं महाराजांस अर्ज केला, कीं 'चिटणीस अग्नि ठवून नवीन पद्धत पाडूं पाहतात; सबब त्यांचा अग्नि काढून टाकावा' (परि० ६, पत्र ५). ह्यावर चिटणिसांचें ह्मणणें असें, कीं "ब्राह्मण आमचे गर्भादानादि संस्कार पूर्ववत् वेदोक्तपद्धतीनें चालवीत नाहींत; नवीन ग्रंथरचना करितात. आह्मी नेहमींप्रमाणें जो अग्नि सिद्ध केला आहे, तोच ठेविला आहे." (परि० ६, पत्र १०).

वर सांगितल्याप्रमाणें परभु व ब्राह्मण जातींत ग्रामण्य चालूं असतांच, सांगलीकरानीं परभुविरुद्ध शके १७४७ सालीं श्रीशंकराचार्याकडून मिळाविलेल्या यादींत, "कलींत क्षत्रिय नाहींत; कै०शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज व शाहूमाहाराज यांनीं क्षत्रिय नाहींत असें ठरविल्याचे दाखले महाराजांच्या दप्तरांत बार झालेले आहेत," असा सर्वथैव खोटा मजकूर घुसडून दिला होता. ह्मणून क्षत्रिय मराठे मंडळीनें ता० २७ जुलई स० १८२७ रोजीं राजमंडळास अर्ज केला, कीं 'यादी परत आणवून किंवा दुसऱ्या रीतीनें ब्राह्मणांनीं खोटीं विधानें करून लोकांचा मुद्दाम गैरसमज केला आहे तो घालवावा; नाहींतर आह्मांस आपला विचार करणें भाग पडेल वगैरे" (परि० ५, पा० १०२); पण समोर असलेल्या कागदपत्रावरून राजमंडळीनें ह्या बाबतींत मन घातलें असें दिसत नाहीं. मात्र वाईप्रांताच्या मामलतदाराचें पत्र (परि० ९, पत्र २) ह्या विषयासंबंधानेंच असावें असें वाटतें. पुढें स० १८३० सालीं महाराजांस पूर्ण मुखत्यारी मिळाली. त्यानंतर महाराजानीं क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्ताच्या हक्कासंबंधाचा विषय हातीं घेऊन, ७।८ वर्षें अव्याहत श्रम करून, सर्व वादग्रस्त मुद्यांचा पंडितांकडून निकाल करवून, आपलें व आपल्या आप्तस्वकियांचें क्षत्रियत्व सर्वमान्य रीतीनें स्थापित केलें, ह्याबद्दल सर्व क्षत्रिय मराठे कै० महाराजांचे अत्यंत ऋणी असले पाहिजेत.

'कलींत क्षत्रिय मुळींच नाहींत, ह्मणून ब्राह्मणाखेरिज इतरांस वेदोक्ताचा अधिकार नाहीं,' हा वादाचा मुख्य मुद्दा असल्यामुळें, क्षत्रिय मराठे व चां० का० प्रभु ह्या जातींचे लोक, पंडितांच्या सभेंत वाद करून आपल्या जातींचें क्षत्रियत्व सिद्ध करण्याकरितां एकत्र झाले, हें अगदीं स्वाभाविकच आहे. श्रीमन्महाराजांनीं वे० शा० विठ्ठल सखाराम उर्फ आबा पारसनीस, चां० का० प्रभु, ह्या विद्वान गृहस्थास क्षत्रियांच्या तर्फे वकीलपत्र दिलें होतें, व विरुद्धपक्षानें वे० शा० राघवाचार्य गजेंद्रगडकर ह्या अत्यंत विद्वान पंडितास आपल्या तर्फें वाद करण्याकरितां नेमिलें होतें. आबा पारसनीस जसें फारशींत निपुण होते तसेंच संस्कृतांतही असून, त्यांचें दोन शास्त्रांचें अध्ययन झालें होतें. साताऱ्यास हल्लीं ज्या वाड्यांत शहरफौजदारकचेरी आहे त्या ठिकाणीं त्यावेळीं संस्कृत पाठशाळा असून, ही जागा वादाकरितां पसंत केली होती. ह्या पाठशाळेंत उभयपक्षांचा वाद कित्येक दिवस लेखी पूर्वपक्ष—उत्तरपक्ष—पद्धतीनें चालला होता. ज्या दिवशीं पंचाचा ठराव व्हावयाचा त्या दिवशीं, पुण्यापासून बेळगांव-पर्यंतच्या प्रांतांतील हजारों ब्राह्मण साताऱ्यास निकाल ऐकण्याकरितां पाठशाळेपुढें जमले होते. आपल्या विरुद्ध निकाल देणारांचीं साधल्यास डोकीं फोडून सूड घेण्याची विद्या भिक्षुकवर्गास चांगली अवगत असल्या-मुळें, निकालाच्या दिवशीं कदाचित् क्षत्रियपक्षाभिमानी पंडितांचा अपमान होईल ह्या भीतीनें महाराज स्वतः नागव्या तरवारीनें पाठशाळेपुढें बंदोबस्त करीत होते ही प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत, आमचे मित्र रा. रा. दत्तात्रय गोविंद कारखानिस, साताऱ्याच्या महाराजांचे माजी कारभारी, ह्या गृहस्थांच्या परमपूज्य कै० वडिलानीं आह्मास सांगितली.

हा जो वर लेखी वाद झाला ह्मणून सांगितलें आहे त्याचा इतिहास ह्मणजेच (१) संस्कृत सिद्धांतविजय, (२) चरणविलास, (३) कर्मकल्पद्रुम, व (४) संस्कृत प्राकृत वंशवृक्ष, इतके ग्रंथ होत. ह्यांपैकीं चरणविलासग्रंथाचा आह्मास मुळीच पत्ता लागला नाहीं. सिद्धांत विजयाचे दहा अध्याय असून, त्यापैकीं पहिले पांच व 'कर्मकल्पद्रुम हे ग्रंथ शिळाप्रेसावर साताऱ्यास छापवून, प्रत्येकाच्या बासष्ट प्रती काढिल्य

होत्या. सिद्धांतविजयाचे पुढले पांच अध्याय श्रुतिस्मृतिसंबंधाचे असल्यामुळें ते न छापितां सरकारांत ठेवून, ज्या कोणास पाहणें असेल त्यास अर्ज केल्यावर पाहण्यास मिळत असत. आह्मास सिद्धांतविजयाची हस्तलिखित प्रत मिळाली आहे; पण तींत शेवटला ह्मणजे दहावा अध्याय मात्र नाहीं. ह्या अध्यायांत 'याज्ञिक' दिलेलें असावें, असा आमचा तर्क आहे. कोणी ह्या अध्यायाचा शोध लावून दिल्यास त्याचे श्रमांचा मोबदला आह्मी देऊं.

पंडितांच्या सभेंत वाद होऊन खालीं दिलेले सिद्धांत पंचांस मान्य झाले :—

(१) श्रीपरशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयत्न केला, तरी केव्हांही क्षत्रियांचा अभाव झाला नाहीं.
(२) ज्या क्षत्रियांचा परशुरामानें वध केला नाहीं त्यांचें वैदिककर्म त्यानें सोडविलें नाहीं.
(३) परशुरामावतारीं क्षत्रबीज दग्ध झाल्यामुळें, गतभर्तृका व निपुत्रिका क्षत्रिय स्त्रियांनीं ब्राह्मणांपासून पुत्रसंतान करून घेतलें ह्मणून क्षत्रिय संकरज होत, हें मिथ्या आहे
(४) दोन राजे सोमसूर्यवंशोद्भव होते ते कलि—आरंभीं बद्रिकाश्रमास गेले ह्मणून कलींत क्षत्रियाभाव सिद्ध होत नाहीं.
(५) नंदानंतर क्षत्रियांचें अस्तित्व होतें.
(६) सुमित्रानंतर क्षत्रियांचें अस्तित्व होतें.
(७) ज्ञातीची ओळख कशी होते, ह्याबद्दल निर्णय.
(८) आचाराप्रमाणें कलींत जाती ठरत नाहींत.
(९) मांसभक्षक क्षत्रियांस कलींत वैदिक कर्म करण्यास कोणतीच हरकत येत नाहीं.
(१०) ओवळ्यानें अन्न सेवन करणाऱ्या क्षत्रियांच्या वैदिककर्मास कलींत बाध येत नाहीं.
(११) क्षत्रियांनीं कलींत शूद्रान्न भक्षण केलें तरी त्यांच्या वैदिककर्मास हरकत येत नाहीं.
(१२) वांगीं, गाजरें इत्यादि अभक्षणीय पदार्थ सेवन केल्या-

सही कलींत क्षत्रियांस वैदिक कर्म करितां येतें.

(१३) ज्या क्षत्रियांच्या घरीं कांहीं कर्माचा लोप आहे, त्यांचें वैदिक कर्म कलींत निर्बाध आहे

(१४) राज्यकर्ता जो राजा त्यास वैदिक मंत्रांनीं राज्याभिषेक होतो, सबब त्यानें तेवढें वैदिक कर्म करावें व इतर क्षत्रियांनीं करूं नये, असें नाहीं; तर कोणत्याही क्षत्रियास वैदिक कर्म विहित आहे.

(१५) कलियुगांत क्षत्रियज्ञातीची ओळख कशी पटते, ह्याबद्दल निर्णय.

(१६) चारी वर्ण अनादि असतां, फक्त क्षत्रियांचीच चारी युगांची पुत्रपौत्रादि वंशावळ लागते ह्याचीं कारणें.

(१७) चार युगांचीं मिळून लाखों वर्षें असतां, सूर्यवंशाच्या वंशवृक्षांत श्रीमत्प्रतापसिंहमहाराजापर्यंत १६१ च पुरुष येतात, ह्याचा उलगडा.

(१८) सातारा, चंदी (तंजावर), नागपूर व करवीर येथील राजघराण्यांचें मूळ एकच असून, यांचेकडे ऋग्वेदावरून कर्म चालतें. चंदीस अग्नि सिद्ध असून, स्वतः राजे (शिवाजीमहाराज) ब्राह्मणास अग्नौकरण देतात, व शास्त्राध्ययन करितात. करवीरींही वेदोक्त कर्म चालत आहे (इ. स १८३०).

(१९) नर्मदेपलीकडे क्षत्रियांकडे यजुर्वेदावरून कर्म चालतें. उदेपुरास अशीच वहिवाट आहे सातान्यास यजुर्वेदी कर्म महाराजानीं सुरू करावें.

(२०) क्षत्रियांस मातुलकन्याविवाह वर्ज्य नाहीं.

(२१) क्षत्रियांत स्वज्ञातींत एकपात्रीं भोजन करण्याची चाल आहे, तरी वैदिककर्मास बाध येत नाहीं.

(२२) क्षत्रियज्ञातींतील कुलांसंबंधीं विवेचन.

(२३) दक्षिण देशांतील महाराष्ट्र क्षत्रियांचीं उपनामें; व भोंसले, शिर्के, महाडिक, मोहिते, गुजर, अहिरराव, पालकर

खानविलकर, माने, घाटगे व जाधव ह्या क्षत्रिय कुळांचीं गोत्रें, प्रवर, हिंदुस्तानांतील नांवें, व दक्षिणी नांवें पडण्याचीं कारणें.

(२४) क्षत्रियांचीं व शूद्रांचीं उपनांवें एकच असलीं तरी ओळख पटण्याचा मार्ग.

हे वर सांगितलेले बहुतेक सिद्धांत व त्यांचे आधार 'सिद्धांत-विजयग्रंथांत' दिलेले आहे. मूळग्रंथ संस्कृत असल्यामुळें, प्राकृत जनांस त्यांतील विषयांचे ज्ञान व्हावें ह्मणून, आह्मी सदरहु ग्रथाचे मराठी भाषांतर करवून मुळासुद्धां छापिलें आहे. ह्या कामीं आमचे मित्र वे० शा० बाळशास्त्री हुपरीकर, राजाराम हायस्कुलांतील शास्त्री, ह्यांची आह्मास सर्वप्रकारें मदत झाली, सबब आह्मी शास्त्रीबोवाचे अत्यंत आभारी आहों.

श्रुतिस्मृतिपुराणादि सकल ग्रंथांचें संदोहन करून, आबासाहेब पारसनिसांनीं जे ग्रंथ तयार केले होते त्यांतील सारांश व संस्कृत वंशवृक्ष बरोबर देऊन, शिवानंदशास्त्री व ठाकुरदास यांस रेसिडेंटाच्या मार्फत, राणाजीस माहिती देण्याकरितां व तिकडील सर्व माहिती आणण्याकरितां उदेपुरास पाठविलें होतें. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें शिवानंदशास्त्रीबोवानीं राणाजीस व तेथील शास्त्रीमंडळीस महाराजांकडील ग्रंथ दाखवून, त्यांची सर्वांची मान्यता मिळविली; व सातारच्या राजांची वंशावळ येथील ओंकार जोशास करून देऊन, ती राणाजीच्या वंशावळींत दाखल करविली इतकेंच नाहीं, तर त्याचा दाखला सातान्यासही राहावा ह्मणून, सदरहु वंशावळीची नक्कल राणाजींचे आज्ञेवरून घेऊन, तीवर कंपनीसरकारचाही शिक्का करून घेतला (परि० ४, पा० ७९, परि० ९, पा० १३१). उदेपुरच्या पंडितरावानीं राणाजींच्या आज्ञेवरून महाराजांस शिवानंदाबरोबरच पत्र दिलें, कीं 'आपल्याकडील शास्त्रार्थाचा राणाजीनीं ब्राह्मण पंडितांकडून निर्णय करवून शिवानंदाजवळ दिला आहे. राणाजी व आपण पूर्वीपासून एकच वंशांतील असून, व्यवहारांत कांहींएक भेद नाहीं; यास्तव आह्मी आपलें शुभचिंतन करीत असतों. इकडे वैदिक कर्माधिकारी क्षत्रिय पुष्कळ असतांही, दक्षिणी ब्राह्मण क्षत्रियांचा अभाव

ह्मणतात, ह्यावरून त्यांचे ठिकाणीं मत्सरबुद्धि वास करीत आहे, असें ह्मटलें पाहिजे.' ह्याप्रमाणें उदेपुरास ग्रंथ मान्य होऊन राणाजीचें वर सांगितल्याप्रमाणें पत्र आल्यावर महाराजांनीं सन १८३२ सालीं सोमसूर्य-वंशोत्पन्न मराठे—क्षत्रियांस यादी पाठवून, क्षत्रियांचे धार्मिक हक्क कोणते व कसें, हें खुलासेवार रीतीनें कळविलें (परि० १).

उत्तरदेशीय ब्राह्मण पंडितांची संमति ग्रंथांस मिळाल्यावर, वे. शा. आप्पाशास्त्री कोल्हारकर व वासुदेवाचार्य गजेंद्रगडकर यांच्याबरोबर सदरहु ग्रंथ देऊन, मान्यता मिळविण्याकरितां व तद्देशीय क्षत्रियांची वहिवाट जाणण्याकरितां, शके १७५४ नंदननामसंवत्सरीं त्यांस कर्नाटकप्रांतीं पाठविलें होतें. त्यांनीं कर्नाटकांत ठिकठिकाणीं जाऊन, पुढारी पंडितांच्या भेटी घेऊन व सभा करून, "सातारचे श्रीप्रतापसिंहमहाराज व त्यांचे शरीरसंबंधी (मोहिते, शिर्के, महाडिक, गुजर, पालकर, अहिरराव इत्यादि) यांस क्षत्रियत्वामुळें वेदाधिकार आहे; कर्नाटकप्रांतीं क्षत्रिय असून त्यांचे घरीं वेदोक्त कर्म आह्मी करितों, व तसेंच साताऱ्यासही करण्यास आह्मी तयार आहों," वगैरे आशयाच्या याद्या, रिवाजपत्र्या व पत्रें आणिलीं (परि० २, पा० १७).

## मान्यतेच्या याद्या आलेलीं ठिकाणें.

| ठिकाण. | यादीचा नंबर. |
|---|---|
| (१) तंजावर संस्थान.... .... .... | १ |
| (२) आनेगोंदी संस्थान .... .... | २ |
| (३) कोची संस्थान .... .... .... | १ |
| (४) ह्मैसूर संस्थान .... .... .... | १ |
| | ५ |

## मान्यतेचीं पत्रें देणारे प्रमुख पंडित.

| नांव. | ठिकाण. |
|---|---|
| (१) पांडुरंगाचार्य भागवत .... .... | अंकलूज. |
| (२) कट्टि गोविंदाचार्य .... .... .... | कुरुंदवाड. |

| | | |
|---|---|---|
| ( ३ ) | नरसिंहाचार्य .... .... .... | आनेगोंदी. |
| ( ४ ) | रघुपत्याचार्य .... .... .... | अरणी संस्थान. |
| ( ५ ) | पांडुरंगाचार्य .... .... .... | चांद्रायणपट्टण. |
| ( ६ ) | आणाशास्त्री राजपुरोहीत .... .... | ह्मैसूर. |
| ( ७ ) | व्यंकटरमणाचार्य .... .... .... | ह्मैसूर. |
| ( ८ ) | बाबाचार्य .... .... ... .... | तंजावर. |
| ( ९ ) | श्रीनिवासाचार्य .... .... .... | म्हैसूर. |
| ( १० ) | बल्लाळ नारायणाचार्य .... .... | तौळवदेश. |
| ( ११ ) | तमंणशास्त्री .... .... .... | चरकल संस्थान. |
| ( १२ ) | भीमाचार्य .... .... .... | आनेगोंदी. |
| ( १३ ) | दासाचार्य .... .... .... | ह्मैसूर. |
| ( १४ ) | रामाचार्य .... .... .... | कोच्ची. |
| ( १५ ) | माधवाचार्य .... .... .... | कोच्ची. |
| ( १६ ) | माधवमताच्या तीर्थाच्या मठाचे श्रीमदाचार्यंचे शिष्यस्वामी .... ... | बेंकीपुर (ह्मैसूर संस्थान) |
| ( १७ ) | श्रृंगेरी शंकराचार्य .... .... | शेडबाळ मुक्कामाहून. |
| ( १८ ) | उडपी संस्थानांतील आठ मठांचे स्वादीकर स्वामी .... .... .... | कोच्ची राज्य. |
| ( १९ ) | लक्ष्मीकांतस्वामी .... .... .... | विद्यानगर. |

## रिवाजपत्र्या.

| | संस्थान | देणाराचें नांव |
|---|---|---|
| ( १ ) | विजयनगर .... .... .... | पुरषोत्तमभट्ट व भगवंतभट्ट |
| ( २ ) | तंजावर .... .... .... | बाबाचार्य राजपुरोहित |
| ( ३ ) | ह्मैसूर .... .... .... | आपाशास्त्री राजपुरोहित |
| ( ४ ) | आनेगोंदीची वशावळ ... .... | ——————— |
| ( ५ ) | कोच्ची .... .... .... | आठ मठाचे स्वामी स्वादीकर श्रीमदाचार्यांचे शिष्य |

ह्याप्रमाणें सातारचे शास्त्रग्रंथ वरील ठिकाणीं मान्य होऊन, भोंसले-प्रभृति अकरा कुळांचें ( भोंसले, मोहिते, माहाडिक, शिर्के. गुजर, पालकर, अहिरराव, खानविलकर, माने, घाटगे, व जाधव ) क्षत्रियत्व स्थापित झालें सन १८३५ सालीं क्षत्रिय मराठे मंडळीच्या सभा होऊन सर्वानुमतें असें ठरलें, कीं "दक्षिणी ब्राह्मण क्षत्रिय मराठ्यांचे घरीं वेदोक्त कर्म करण्याचें नाकारितात; तर त्यांची गरज न ठेवितां, उत्तरहिंदुस्थानांतून जे ब्राह्मण आपल्या खात्रीचे ह्मणून शिवानंदशास्त्री घेऊन येतील त्यांस उपाध्याची वृत्ति देऊन, त्यांजकडून पद्धतशीर कर्म आपण चालवूं लागावें. तसेंच उदेपुरवाले व आपण एकच असल्याकारणानें अन्नव्यवहार व शरीरसंबधही होण्यास हरकत नाहीं. परंतु हिंदुस्थानी व दक्षिणी क्षत्रियांचा संबंध तुटून बरींच वर्षे झालीं आहेत; शिवाय देशचालीनें इकडील व तिकडील आचारविचारांतही फरक पडलेला आहे. करितां राणाजी व त्यांची आप्तस्वकीय मंडळी जर आपणांशीं एकपात्र करतील, तर शरीरसंबंध सुरू करण्यास कोणतीच अडचण राहणार नाहीं. पण जर अशा प्रकारचा अन्नव्यवहार होत नसेल तर शरीरसंबंधाची गोष्ट सोडून देऊन, फक्त तिकडील ब्राह्मण आणून यजुर्वेदी कर्म सुरू करावें." ह्या ठरावाप्रमाणें वागण्यास जे क्षत्रिय मराठे कबूल झाले, त्यांच्याकडून त्याप्रमाणें कबुलायती करून घेतल्या (परि. ७, पा. ११६ ); परंतु ह्याची अमलबजावणी झालेली दिसत नाहीं. हिंदुस्थानी व दक्षिणी क्षत्रियांच्या रीतीभातींत बरीच भिन्नता असल्यमुळें अन्नव्यवहार शरीरसंबंध एकदम सुरू होण्याचा मुळींच संभव नव्हता.

आपलें व आपल्या आप्तस्वकियांचें क्षत्रियत्व स्थापून महाराज स्वस्थ बसले नाहींत; तर आपल्या धार्मिक हक्कांप्रमाणें वागण्याचाही त्यांनीं उपक्रम केला. इ. स १८१६ सालीं सातारचे पंडितराव व राजोपाध्ये ह्या भाउबंदांमध्यें वृत्तीसंबधानें तंटा लागून खटला सरकारांत आला असतां, महाराजांनीं चिटणिसाकडून याद्या पाठवून, वादि प्रतीवादींचे जबाब आणवून, पंचामार्फत खटल्याचा निकाल करून, पंडितराई व उपाध्यायी ह्या कामांचे जाबते पाडून दिले. सन १८२१।२२ सालीं सदरहु कामांचे जे जाबते पाडून दिले होते, ते पूर्ण चौकशी करून झालेले

नव्हते (परि. ८, पा. १२१). नवीन पाडून दिलेल्या जाबत्यांतील कलमांवरून असें दिसून येतें, कीं राजोपाध्ये यांच्या कामावर पंडितरावास नीट देखरेख करण्यास सांगून, योग्य ब्राह्मणांकडून योग्य रीतीनें गृह्यकृत्यें करवून घेण्याविषयीं उभयतांस निक्षून ताकीद देण्यांत आली होती. तसेंच सर्वविद्यापरीपूर्ण होऊन व चांगल्या वर्तणुकीनें यजमानाची मर्जी राखून आपापलें काम करण्याविषयींही उभयतांस आज्ञा झाली होती; व ह्या आज्ञेचा भंग करणारास कामावरून दूर करून, त्याच्या रिकाम्या झालेल्या जागीं दुसरा अधिकारी नेमण्याचा अधिकार महाराजानीं आपले स्वाधीन ठेविला होता (परि. ८, पा. १३०). महाराज स्वतः व बंधु शहाजीराजे (आपासाहेब) उभतां स्नानसंध्यादि कर्में नित्य करीत असत (परि. ६, पत्र ४).

राजघराण्याच्या गृह्यकृत्यांची व्यवस्था वर सांगितल्याप्रमाणें लावून वैदिक—कर्माचा उपक्रम केल्यावर, आपणास शिवछत्रपतीप्रमाणें यथाविधि राज्याभिषेक करून घेण्याचा विचार करून, महाराजानीं सर्व तयारी करण्यास आज्ञा केली; पण राज्याभिषेकाची पोथी कोठें मिळेना. क्षत्रियेतरास राज्याभिषेकाचा अधिकार नसल्या मुळें ब्रह्मकर्माच्या पोथींत हा प्रयोग नसतो. ही अडचण उपस्थित होतांच, महाराजानीं विद्वान शास्त्र्यांकडून सदरहु प्रयोगाची पोथी शके १७५८ (स. १८३६) सालीं तयार करविली (परि. ३, पा. ५७). राज्याभिषेकासाठीं पवित्र नद्या महासागर यांचें उदक आणविलें होतें (परि. ३, पत्रें २-९).

उदक पाठविणारा.

| | | |
|---|---|---|
| (१) | भीमाचार्य .... | .... हेम |
| (२) | वेणिमाधवाचार्य | .... मल |
| (३) | महादेव दीक्षीत | .... घट |
| (४) | तिरपति श्रीनिवासाचार्य | .... का |
| (५) | बाळाचार्य करजगीकर | .... वर |
| (६) | व्यंकट रामावधानी | .... मह |

(७) तमंणशास्त्री .... .... कपिला गौतमी (नञ्जुडेश्वर)
(८) शंकरराव कृष्ण .... .... तुंगभद्रा (हायहांदुरात)

याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर, शके १७९९ हेमलंबिनाम संवत्सरांत, कै. महाराजांस यथाविधि राज्याभिषेक शाहूनगरांत झाला, तेव्हां महाराष्ट्रांत बहुतेक हिंदुधर्माभिमानी लोकांस अत्यानंद झाला. हा समारंभ निर्विघ्नपणें पार पडल्यावर, ह्या ग्रामण्यांत पुढाकार घेऊन आपल्या विद्वत्तेनें क्षत्रियांचे अस्तित्व स्थापित करणारे वे. शा. आबा पारसनीस यांस त्यांच्या विनंतीवरून, महाराजानीं त्यांच्या अप्रतिम कामगिरीचा उल्लेख करून आपल्या शिक्कयामोर्तबानिशीं आज्ञापत्र स. १८३८ त करून दिलें-हें अस्सल आज्ञापत्र कै. आबांचे नातु रा. रा. पांडुरंग नृसिंह उर्फ तात्यासाहेब पारसनीस, फौजदार कऱ्हाड, जिल्हा सातारा, यांचेपाशीं आहे. व तें कायस्थ-प्रभु-रत्नमालेंत परिशिष्टरूपानें पर्वींच प्रसिद्ध झालेलें आहे (परि. १० पा. १३९).

ह्याप्रमाणें क्षत्रिय मराठे आणि ब्राह्मण ह्या जातींमधील ७०।७९ वर्षांपूर्वींच्या ग्रामण्याची हकीकत झाली. प्रस्तुत करवीरास अशा प्रकारचें ग्रामण्य उपस्थित होऊन ब्रह्मवृंदांत दोन तट पडले आहेत. राजोपाध्येप्रभृति आश्रित ब्राह्मणांनीं राजवाड्यांत वेदोक्त पद्धतीनें कर्मे चालविण्याचें नाकारिल्यामुळें, कै. बाबासाहेब महाराज यांचे कारकिर्दीत (इ. स. १८३७- १८६६) राजवाड्यांत नित्यनैमित्तिक कर्मे, अनुष्ठानें वगैरे कोणत्या पद्धतीनें होत होतीं ह्याबद्दल दाखले पाहून व तपास करून रिपोर्ट करण्याविषयीं श्री. रा. रा. आपासाहेब राजोपाध्ये, रा. बा. कृष्णाजी नारायण पंडितराव सरन्यायाधीश, व रा. सा. विश्वनाथ बल्लाळ गोखले, ह्या तीन गृहस्थांची कमेटी शके १८२४ (इ. स. १९०२।०३) सालीं श्रीमन्महाराजसरकारनीं नेमिली होती. ह्या गृहस्थांनीं सुमारें वीस असामींच्या साक्षी घेतल्या, व इतर रीतीनें तपास केला. श्री. आपासाहेब राजोपाध्यानीं आपला रिपोर्ट सरकारांत पाठविला नाहीं; पण रा. ब. पंडितराव, व रा. सा. गोखले यांनीं अभिप्राय दिला, कीं "महाराजांचें पूर्वज वेदाधिकारी असून, कै. बाबासाहेब महाराजानीं वे. शा. रघुनाथ-

शास्त्री पर्वते यांच्या सांगण्यावरून पुराणोक्त कर्म सुरू होईपर्यंत वाड्यांत वेदोक्त कर्म चालत होतें" (परि. ११ पत्र १). सातारच्या ग्रामण्याचे वेळीं (इ. स. १८३०--१८३९) करवीरास वेदोक्त कर्म चालत होतें, असा उल्लेख पूर्वींच आलेला आहे; व हा काळ ह्मटला ह्मणजे कै. बुवा-साहेबमहाराजांच्या कारकिर्दीचा शेवट व कै. बाबासाहेबांच्या कारकिर्दीचा प्रारंभ होय.

वेदोक्त कमेटीच्या वरील अभिप्रायाप्रमाणें राजोपाध्ये यानीं वागण्याचें साफ नाकारिलें, तेव्हां त्यांस कामावरून दूर करून राजोपाध्यायीबद्दल दिलेली जहागीर परत घेणें श्रीमन्महाराजसरकारास भाग पडलें. पुढें शके १८२७ (इ. स. १९०५।०६) सालीं करवीरमठाधीश्वर श्रीशंकराचार्यस्वामीनीं ठराव केला, कीं "श्रीमन्महाराजछत्रपती कोल्हापूर यांचें घराणें क्षत्रिय असून, त्यांचे घराण्यांत वेदोक्त कर्म करण्यास कांहीं हरकत नाहीं" (परि. ११, पत्र २).

श्रीशंकराचार्यस्वामींचा वरप्रमाणें ठराव झाल्यावर, करवीर--ब्रह्म-वृंदापैकीं बऱ्याच लोकांची संशयनिवृत्ति होऊन, यांनीं सभा भरवून ठराव केला, कीं "श्रीशाहूछत्रपती सरकार करवीर हे क्षत्रिय आहेत. या राजघराण्यांतील नित्य नैमित्तिक गृह्यकृत्यें व हव्यकव्यादि धर्मकृत्यें मन्वादिस्मृतिप्रतिपादित पूर्वापार वहिवाटीस अनुसरून क्षत्रियोचित वेदोक्त पद्धतीनें होत जावीत. याविषयीं कोणीही संदेह घेणेचा नाहीं" (परि. ११. पत्र ३).

ह्याच सुमारास श्रीकाशीक्षेत्राचे प्रसिद्ध पंडित श्रीकृष्णानंद-सरस्वती-स्वामी करवीरस्थ श्रीमहालक्ष्मीचें दर्शन करण्याकरितां या प्रांतीं आले होते. त्यांचेंही मत असें पडलें, कीं "श्रीमहाराजांच्या वेदाधिकाराविषयीं जो ठराव श्रीशंकराचार्य मठकरवीर यांनीं केला आहे, तो अगदीं बरोबर आहे" (परि० ११, पत्र ४).

श्रीमन्महाराजसरकारांच्या वेदाधिकाराविषयीं कित्येक लोक असा आक्षेप घेतात, कीं 'भोंसलेकुलाला जरी वेदाधिकार असला तरी महाराज ज्या

घराण्यांतून दत्तक आले आहेत तें घाटगे-घराणें क्षत्रिय नाहीं; ह्मणून तो अधिकार महाराजांस प्राप्त होत नाहीं.' ह्यास उत्तर असें, कीं महाराष्ट्रांत घाटग्यांचें घराणें शिवछत्रपतीच्या भोंसलेघराण्यापेक्षांही जुनें असून, त्या घराण्यानें हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आल्यावर आपल्या मूळच्या चालीरीतींत फारसा फरक पडूं दिलेला नाहीं हिंदुस्थानांत घाटग्यांस 'राठोर' ह्मणतात; व इडरगड, सिताम, रतलाम, घाणोरा, वजीजोर येथील घराणीं व महाराष्ट्रांतील कागलचें घराणें, हीं सर्व मूळचीं एकच होत (परि० ४, पा० ९३।९४). सातारच्या राजघराण्याशीं घाटगेघराण्याचा अलीकडे शरीरसंबंध झालेला (परी० ७, पा० ११६) नाहीं तरी, ज्याअर्थी हें घराणें एकादश कुलांमध्यें गणलें जातें, त्याअर्थी त्याच्या क्षत्रित्वाबद्दल कुठींच संशय राहत नाहीं. ह्यावर कोणी अशी शंका घेतील, कीं घाटगेघराणें जरी मूळचें क्षत्रिय असलें, तरी त्यांत उपनयनादि संस्कारांची वहिवाट नसल्यामुळें, त्याकडे शूद्रत्व येतें. ह्या शंकेचें उत्तर असें, कीं राजपुतान्यांत अशीं अनेक घराणीं आहेत, कीं त्यांच्यामध्यें उपनयनादि संस्कार मुळींच होत नसून तीं क्षत्रिय गणलीं जातात (परी० ११, पत्र ५). तेव्हां अशा प्रकारची उपनयनाची वहिवाट दक्षिणी राठोर घराण्यांत नसल्यास त्याला शूद्रत्व येत नाहीं इतकेंच नाहीं, तर राजपुतान्यांतील क्षत्रियांप्रमाणें घाटग्यांस वाटेल तेव्हां आपले संस्कार वैदिकपद्धतीनें करण्याची चाल पाडतां येईल (परी० ११, पा० ५). कोल्हापुर प्रांतांत कित्येक उच्च कुलांतील मराठ्यांकडे वेदोक्त पद्धतीनें श्रावणी होते, असा उल्लेख स० १८८६ सालीं छापलेल्या कोल्हापुर—ग्याझेटियरमध्यें आहे (पा० ८०।८१). अशी वस्तुस्थिति असतां जे ब्राह्मण दुराभिमानानें प्रेरित होऊन भोळ्या क्षत्रिय मराठ्यांचा धर्म बुडवूं पाहत आहेत त्यांचें पारिपत्य करून, श्रीमन्महाराज आपल्या घराण्याच्या व इतर ज्ञातिबांधवांच्या धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न मनोभावानें करीत आहेत, ह्यावरून श्रीशाहूछत्रपती महाराज हें प्रत्यक्ष भगवंताचा अवतार आहेत, असें ह्मणावें लागतें.

शेवटीं आमची सर्वांस अशी सविनय प्रार्थना आहे, कीं ह्या पुस्तकांत दिलेल्या पुराव्यावरून जें आमचें मत झालें आहे तें आपणां-

पुढें प्रस्तावनारूपानें मांडिलें आहे. त्यांत चूक झाली असल्यास ती आमच्या नजरेस आणण्याची मेहरबानी करावी. तसेंच, कोणास पुराव्याच्या कागदांच्या अस्सलपणाविषयीं संशय आल्यास, आह्मी आपल्या जवळचा पाहिजे तो कागद कोणासही दाखविण्यास तयार आहों.

कोल्हापूर,
२३ जुलई सन १९०६ इ०

म. ग. डोंगरे,
प्रकाशक.

३२५

## जाहिरात.

### भोसले-कुलाचा वंशवृक्ष परिशिष्टासह.

( १ ) पुस्तकरूपानें बांधलेला:—बांधणी उत्तम कापडी. वरच्या बाजूस श्रीअष्टभुजभवानीचा व मागल्या बाजूस करवीर सरकारच्या कोट ऑफ आर्मचा सोनेरी उठाव असून त्यांच्या सभोंवती सोनेरी नक्षी. किंमत रुपये सात ( ७ ).

श्रीमंत लोकांच्या दिवाणखाण्यांत मेजावार ठेवण्यासाठीं, पहिल्याप्रतीच्या मोरोक्को लेदरच्या बांधणीची कांहीं पुस्तकें तयार आहेत. अशा प्रत्येक पुस्तकाची किंमत रुपये पंचवीस ( २५ ).

( २ ) नकाशेः—नकाशा लांबी सुमारें १२ $\frac{१}{२}$ फुट व रुंदी सुमारें १४ $\frac{१}{२}$ इंच; दोन्ही शेंवटांस शिसवी लांकडाचे काळे रोगणी रूळ. वरच्या रुळास टांगण्याकरितां रेशमी गोफ, व नकाशा गुंडाळल्यावर बांधण्याकरितां लोंकरी फीत. लांबीच्या बाजवांस रेशमी फीत यंत्रांवर शिवून लाविलेली. नकाशाचे कागद उत्तम सफाईदार पांढऱ्या कापडावर चढविलेले. किंमत रुपये दहा ( १० ).

### श्रीसिद्धांतविजयग्रंथ.

सफाईदार जाड कागदावर निर्णयसागरच्या नवीन टाइपांत छापलेला. बांधणी उत्तम कापडी. किंमत रुपये तीन ( ३ ).

वरील किंमतीशिवाय प्याकिंग व टपालचा खर्च निराळा पडेल. पुस्तकें मागविणें तीं खालील पत्त्यावर मागवावीं. दहाप्रती एकदम मागविणारास अकरावी प्रत कमिशनदाखल दिली जाईल. एजंटस् पाहिजे आहेत.

**पत्ताः**—बाळकृष्ण रामचंद्र कारखानिस, ड्रॉइंग मास्तर टेक्निकल स्कूल,
कोल्हापूर.

REFBK-0000325